मराठी

# सुगमभारती

## इयत्ता सातवी



# भारताचे संविधान

**भाग ४ क**

## नागरिकांची मूलभूत कर्तव्ये

**अनुच्छेद ५१ क**

**मूलभूत कर्तव्ये – प्रत्येक भारतीय नागरिकाचे हे कर्तव्य असेल की त्याने –**

(क) प्रत्येक नागरिकाने संविधानाचे पालन करावे. संविधानातील आदर्शांचा, राष्ट्रध्वज व राष्ट्रगीताचा आदर करावा.

(ख) स्वातंत्र्याच्या चळवळीला प्रेरणा देणाऱ्या आदर्शांचे पालन करावे.

(ग) देशाचे सार्वभौमत्व, एकता व अखंडत्व सुरक्षित ठेवण्यासाठी प्रयत्नशील असावे.

(घ) आपल्या देशाचे रक्षण करावे, देशाची सेवा करावी.

(ङ) सर्व प्रकारचे भेद विसरून एकोपा वाढवावा व बंधुत्वाची भावना जोपासावी. स्त्रियांच्या प्रतिष्ठेला कमीपणा आणतील अशा प्रथांचा त्याग करावा.

(च) आपल्या संमिश्र संस्कृतीच्या वारशाचे जतन करावे.

(छ) नैसर्गिक पर्यावरणाचे जतन करावे. सजीव प्राण्यांबद्दल दयाबुद्धी बाळगावी.

(ज) वैज्ञानिक दृष्टी, मानवतावाद आणि जिज्ञासूवृत्ती अंगी बाळगावी.


(झ) सार्वजनिक मालमत्तेचे जतन करावे. हिंसेचा त्याग करावा.

(ञ) देशाची उत्तरोत्तर प्रगती होण्यासाठी व्यक्तिगत व सामूहिक कार्यात उच्चत्वाची पातळी गाठण्याचा प्रयत्न करावा.

(ट) ६ ते १४ वयोगटातील आपल्या पाल्यांना पालकांनी शिक्षणाच्या संधी उपलब्ध करून द्याव्यात.

## ● आम्ही चित्र वाचतो .

● चित्र पहा. चित्रात दिलेल्या रिकाम्या चौकटीत चित्राचे वर्णन करणारी सात-आठ वाक्ये लिहा.



शासन निर्णय क्रमांक : अभ्यास-२११६/(प्र.क्र.४३/१६) एसडी-४ दिनांक २५.४.२०१६ अन्वये स्थापन करण्यात आलेल्या समन्वय समितीच्या दि. ३.३.२०१७ रोजीच्या बैठकीमध्ये हे पाठ्यपुस्तक निर्धारित करण्यास मान्यता देण्यात आली आहे.



## मराठी

# सुगमभारती

## इयत्ता सातवी

(उर्दू, कन्नड, गुजराती, तेलुगू, सिंधी इत्यादी माध्यमांच्या शाळांसाठी.)

महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती
व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे.

D45XX3

आपल्या स्मार्टफोनवरील DIKSHA APP द्वारे पाठ्यपुस्तकाच्या पहिल्या पृष्ठावरील Q. R. Code द्वारे डिजिटल पाठ्यपुस्तक व प्रत्येक पाठामध्ये असलेल्या Q. R. Code द्वारे त्या पाठासंबंधित अध्ययन अध्यापनासाठी उपयुक्त दृकश्राव्य साहित्य उपलब्ध होईल.

प्रथमावृत्ती : २०१७
चौथे पुनर्मुद्रण : २०२१

© महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे – ४११ ००४.
या पुस्तकाचे सर्व हक्क महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळाकडे राहतील. या पुस्तकातील कोणताही भाग संचालक, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ यांच्या लेखी परवानगीशिवाय उद्धृत करता येणार नाही.

**मराठी भाषा तज्ज्ञ समिती :**
श्री. नामदेव चं. कांबळे (अध्यक्ष)
फादर फ्रान्सिस दिब्रिटो (सदस्य)
डॉ. स्नेहा जोशी (सदस्य)
डॉ. रोहिणी गायकवाड (सदस्य)
डॉ. माधुरी जोशी (सदस्य)
श्री. अमर हबीब (सदस्य)
श्रीमती अर्चना नरसापूर (सदस्य)
श्रीमती सविता अनिल वायळ (सदस्य-सचिव)

**मराठी भाषा अभ्यासगट सदस्य**

श्री. समाधान शिकेतोड
श्री. बापू शिरसाठ
श्रीमती प्रांजली जोशी
श्रीमती वैदेही तारे
श्री. मयुर लहाने
प्रा. विजय राठोड
डॉ. माधव बसवंते
श्री. देविदास तारू
श्री. संदीप रोकडे
श्रीमती स्मिता गालफाडे
डॉ. प्रमोद गारोडे
श्री. प्रमोद डोंबे
श्री. शिवा कांबळे
डॉ. सुभाष राठोड
श्री. मोहन शिरसाट
श्री. नाना लहाने
डॉ. शारदा निवाते
श्रीमती अनुजा चव्हाण
श्री. प्रवीण खैरे
श्रीमती प्रतिभा लोखंडे
डॉ. मंजूषा सावरकर
श्रीमती जयमाला मुळीक
श्रीमती स्वाती ताडफळे
डॉ. नंदा भोर
डॉ. कमलादेवी आवटे
श्री. हेमंत गव्हाणे

**संयोजन :**
श्रीमती सविता अनिल वायळ
विशेषाधिकारी, मराठी

**चित्रकार :**
फारुख नदाफ

**मुखपृष्ठ :**
फारुख नदाफ

**अक्षरजुळणी :**
भाषा विभाग,
पाठ्यपुस्तक मंडळ, पुणे.

**निर्मिती :**
सच्चितानंद आफळे
मुख्य निर्मिती अधिकारी
संदीप आजगांवकर,
निर्मिती अधिकारी

**कागद :**
७० जी.एस.एम. क्रिमवोव्ह

**मुद्रणादेश :**
N/PB/2021-22/

**मुद्रक :** M/s

**प्रकाशक :**
विवेक उत्तम गोसावी
नियंत्रक,
पाठ्यपुस्तक निर्मिती मंडळ,
प्रभादेवी, मुंबई – २५.

# प्रस्तावना

**प्रिय विद्यार्थी मित्रांनो,**

तुम्हां सर्वांचे इयत्ता सातवीच्या वर्गात स्वागत आहे. यापूर्वीच्या वर्गांत मराठी सुगमभारती हे पाठ्यपुस्तक तुम्ही अभ्यासले आहे. इयत्ता सातवीचे हे पाठ्यपुस्तक तुम्हांला अभ्यासायला देताना अतिशय आनंद होत आहे.

मित्रांनो, मराठी ही आपल्या राज्याची राजभाषा आहे. इतरांशी संवाद साधण्यासाठी, आपले विचार, भावभावना व्यक्त करण्यासाठी आपण मोठ्या प्रमाणावर मराठी भाषेचा वापर करतो. मराठी भाषेतून चांगला संवाद साधता येण्यासाठी, आपली शब्दसंपत्तीही चांगली हवी. या पाठ्यपुस्तकातील कथा, संवाद, पाठ, कविता, गीते वाचून तुम्हांला नवनवीन शब्द शिकायला मिळणार आहेत. हे पुस्तक वाचून, वापरून तुम्हांला मराठी भाषेची गोडी लागावी असे आम्हांला वाटते.

पाठ्यपुस्तकात तुम्हांला आवडतील अशी शब्दकोडी आणि 'वाचा', 'चर्चा करा, सांगा', 'खेळ खेळूया' अशा अनेक कृती दिल्या आहेत. तसेच व्याकरण घटकांची सोप्या रीतीने ओळख करून दिली आहे. शिवाय तुमच्या नवनिर्मितीबद्दल बोलण्याची, लिहिण्याची संधीही तुम्हांला मिळणार आहे. तुम्हांला संगणक, मोबाईल सहजपणे हाताळता येतो. या तंत्रज्ञानाचा अभ्यासासाठी उपयोग व्हावा यादृष्टीनेही काही कृती करण्यासाठी दिल्या आहेत. मराठी भाषा शिकत असताना त्यातून काही मूल्ये शिकणे, सामाजिक समस्या जाणून घेणे, त्या सोडवण्यासाठी तत्पर राहायला शिकणे हेही महत्त्वाचे आहे. या दृष्टीनेही या पाठ्यपुस्तकातील पाठ, कृती, स्वाध्याय यांचा विचार करा.

हे पाठ्यपुस्तक तुम्हांला आवडले का, ते आम्हांला कळवा. तुम्ही दैनंदिन जीवनात आणि पुढील आयुष्यात मराठीचा नक्कीच प्रभावीपणे वापर कराल, होय ना?

तुम्हां सर्वांना शुभेच्छा!

**(डॉ. सुनिल मगर)**
संचालक
महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे.

पुणे
दिनांक : २८ मार्च, २०१७, गुढीपाडवा
भारतीय सौर : ७ चैत्र १९३९

# भारताचे संविधान

## उद्देशिका

**आम्ही, भारताचे लोक, भारताचे एक सार्वभौम समाजवादी धर्मनिरपेक्ष लोकशाही गणराज्य** घडविण्याचा व त्याच्या सर्व नागरिकांस:

सामाजिक, आर्थिक व राजनैतिक **न्याय;**
विचार, अभिव्यक्ती, विश्वास, श्रद्धा
व उपासना यांचे **स्वातंत्र्य;**
दर्जाची व संधीची **समानता;**

निश्चितपणे प्राप्त करून देण्याचा
आणि त्या सर्वांमध्ये व्यक्तीची प्रतिष्ठा
व राष्ट्राची एकता आणि एकात्मता
यांचे आश्वासन देणारी **बंधुता**
प्रवर्धित करण्याचा संकल्पपूर्वक निर्धार करून;

**आमच्या संविधानसभेत**
आज दिनांक सव्वीस नोव्हेंबर, १९४९ रोजी
**याद्वारे हे संविधान अंगीकृत आणि अधिनियमित करून स्वत:प्रत अर्पण करीत आहोत.**

# राष्ट्रगीत

जनगणमन-अधिनायक जय हे
भारत-भाग्यविधाता ।
पंजाब, सिंधु, गुजरात, मराठा,
द्राविड, उत्कल, बंग,
विंध्य, हिमाचल, यमुना, गंगा,
उच्छल जलधितरंग,
तव शुभ नामे जागे, तव शुभ आशिस मागे,
गाहे तव जयगाथा,
जनगण मंगलदायक जय हे,
भारत-भाग्यविधाता ।
जय हे, जय हे, जय हे,
जय जय जय, जय हे ।।

# प्रतिज्ञा

भारत माझा देश आहे. सारे भारतीय माझे बांधव आहेत.

माझ्या देशावर माझे प्रेम आहे. माझ्या देशातल्या समृद्ध आणि विविधतेने नटलेल्या परंपरांचा मला अभिमान आहे. त्या परंपरांचा पाईक होण्याची पात्रता माझ्या अंगी यावी म्हणून मी सदैव प्रयत्न करीन.

मी माझ्या पालकांचा, गुरुजनांचा आणि वडीलधाऱ्या माणसांचा मान ठेवीन आणि प्रत्येकाशी सौजन्याने वागेन.

माझा देश आणि माझे देशबांधव यांच्याशी निष्ठा राखण्याची मी प्रतिज्ञा करीत आहे. त्यांचे कल्याण आणि त्यांची समृद्धी ह्यांतच माझे सौख्य सामावले आहे.

# भाषाविषयक अध्ययन निष्पत्ती : संयुक्त भाषा मराठी सातवी

| अध्ययन-अध्यापनाची प्रक्रिया | अध्ययन निष्पत्ती |
|---|---|
| सर्व विद्यार्थ्यांना (वेगळ्या रूपात सक्षम मुलांसहित) व्यक्तिगत किंवा सामूहिक स्वरूपात प्रोत्साहन दिले जावे कारण त्यांना –<br>➢ आपल्या भाषेत बोलण्याची तसेच चर्चा करण्याची संधी दिली जावी.<br>➢ वापरल्या जाणाऱ्या भाषेच्या बारकाव्यांवर चर्चा करण्याची संधी दिली जावी.<br>➢ सक्रिय आणि जागरूक असण्यासाठी तयार केले जाणारे साहित्य (उदा., वर्तमानपत्र, पत्रिका, चित्रपट आणि दृक्‌श्राव्य साहित्य इत्यादी.) पाहण्याची, ऐकण्याची, वाचण्याची, लिहिण्याची आणि चर्चा करण्याची संधी दिली जावी.<br>➢ गटात कार्य करताना आणि एकमेकांच्या कामांबाबत चर्चा करणे, मत देणे-घेणे, प्रश्न विचारण्याचे स्वातंत्र्य दिले जावे.<br>➢ मराठीबरोबरच आपल्या भाषेतील साहित्य वाचण्याची तसेच लिहिण्याची सुविधा आणि त्यावर चर्चा करण्याचे स्वातंत्र्य दिले जावे.<br>➢ आपल्या परिवाराशी आणि समाजाशी संबंधित विविध साहित्यांचे वाचन आणि त्यावर चर्चा करण्याची संधी दिली जावी.<br>➢ आपली भाषा वाचत असताना लिहिण्यासंदर्भात क्रियाही आयोजित कराव्यात.<br>उदा., शब्दखेळ, शब्दकोडी.<br>➢ मराठी भाषेमधील संदर्भाला अनुसरून भाषेचे विश्लेषण (व्याकरण, वाक्यरचना, विरामचिन्हे इत्यादी.) करण्याची संधी दिली जावी.<br>➢ कल्पनाशक्ती आणि सृजनशीलतेचा विकास करण्याच्या क्रिया उदा., अभिनय, मूक अभिनय, कविता, पाठ, सृजनात्मक लेख, विविध स्थितींमधील संवाद इत्यादींचे आयोजन केले जावे आणि त्याच्या तयारीशी संबंधित लिखित साहित्य आणि अहवाल लेखनाची संधी दिली जावी.<br>➢ साहित्य आणि साहित्यिक तत्त्वांची समज वाढण्याची संधी दिली जावी.<br>➢ शब्दकोशाचा वापर करण्यासाठी प्रोत्साहन दिले जावे.<br>➢ भाषा समृद्धीसाठी बालसाहित्याबरोबरच इतर साहित्याचा संग्रह करणे व त्याचे सादरीकरण करण्याची संधी उपलब्ध करून दिली जावी.<br>➢ परिपाठ व इतर कार्यक्रमांतून सुविचार, कथा, विविध विषय मांडण्याची संधी उपलब्ध करून दिली जावी.<br>➢ परिसरातील विविध ठिकाणे, भेटणाऱ्या व्यक्ती यांबाबत विचार मांडण्याची संधी दिली जावी. | 07.LA.01 पाहिलेल्या व ऐकलेल्या घटना (उदा., स्थानिक सामाजिक घटना, कार्यक्रम) यांविषयी न अडखळता बोलतात, प्रश्न विचारतात, मत मांडतात.<br>07.LA.02 पाहिलेल्या, ऐकलेल्या गोष्टी/घटना/मुद्दे स्वतःच्या भाषेत कथन करतात, लिहितात.<br>07.LA.03 रेडिओ, दूरदर्शन, वर्तमानपत्रे, इंटरनेट यांद्वारे पाहिलेल्या, ऐकलेल्या घटना स्वतःच्या शब्दांत मांडतात. तसेच यांचा वापर करून अधिकची माहिती मिळवतात.<br>07.LA.04 विविध प्रसारमाध्यमांद्वारे प्रसारित होणाऱ्या बातम्या, चर्चा व संवाद समजपूर्वक ऐकतात.<br>07.LA.05 सार्वजनिक ठिकाणांवरील सूचना समजपूर्वक ऐकतात.<br>07.LA.06 विविध विषयांसाठी, विविध उद्देशांसाठी विरामचिन्हांचा योग्य वापर करून लेखन करतात.<br>07.LA.07 वेगवेगळ्या प्रसंगी वेगवेगळ्या उद्देशांनुसार लिहिताना शब्द, वाक्य, वाक्प्रचार, म्हणी यांचा योग्य वापर करतात.<br>07.LA.08 पाठ्यविषय (पाठ, कविता, विनोद, गाणी) इत्यादी लक्षपूर्वक ऐकून त्यांचा आनंद घेतात, योग्य आरोह-अवरोहासह म्हणतात, त्यांच्या ध्वनिफिती समजपूर्वक ऐकतात.<br>07.LA.09 आवडलेली कथा, विनोद, कविता यांचे साभिनय सादरीकरण करतात.<br>07.LA.10 वर्तमानपत्रे, मासिके व पुस्तके यांतील बालसाहित्याचे समजपूर्वक वाचन करून आस्वाद घेतात, संग्रह करतात.<br>07.LA.11 सार्वजनिक ठिकाणच्या सूचना समजपूर्वक वाचतात.<br>07.LA.12 घरी व परिसरात घडणारे अनौपचारिक संभाषण समजपूर्वक ऐकतात.<br>07.LA.13 मोठ्या माणसांच्या संवादात, मित्रांच्या गटचर्चेत सहभागी होऊन आपले मत सुस्पष्टपणे मांडतात.<br>07.LA.14 दिलेल्या शब्दांचा, शब्दसमूहांचा, म्हणी व वाक्प्रचारांचा जीवनव्यवहारात उपयोग करतात, त्यांचा संग्रह करतात.<br>07.LA.15 योग्य गतीसह समजपूर्वक प्रकट वाचन व मूकवाचन करतात.<br>07.LA.16 भाषिक खेळासंदर्भात माहिती सांगतात.<br>07.LA.17 घर, शाळा, समाज व परिसर यांमध्ये होणाऱ्या उपक्रमात सहभागी होतात.<br>07.LA.18 दिलेल्या उताऱ्याचे समजपूर्वक वाचन करून योग्य शीर्षक देतात.<br>07.LA.19 दिलेल्या विषयांवर प्रश्नावली तयार करून लिहितात.<br>07.LA.20 परिसरातील सामाजिक समस्यांची जाणीव निर्माण होऊन त्याबाबत योग्य विचार मांडतात<br>07.LA.21 विनोद वाचून त्याचा आनंद घेतात.<br>07.LA.22 लेखन करताना दोन शब्दांत योग्य अंतर ठेवतात.<br>07.LA.23 परिच्छेदाचे अचूक अनुलेखन व श्रुतलेखन करतात.<br>07.LA.24 चित्र/प्रसंग वर्णन स्वतःच्या शब्दांत लिहितात.<br>07.LA.25 व्याकरण घटकांची माहिती घेतात व त्यांचा योग्य वापर करतात. उदा., क्रियाविशेषण अव्यये, शब्दयोगी अव्यये, उभयान्वयी अव्यये, केवलप्रयोगी अव्यये, पूर्णविराम, स्वल्पविराम, प्रश्नचिन्ह, एकेरी व दुहेरी अवतरणचिन्ह व शुद्धलेखनाचे नियम<br>07.LA.26 शब्दकोश अकारविल्हेन्यानुसार पाहतात. |

# अनुक्रमणिका

## भाग – १


| अ. क्र. | पाठाचे नाव | लेखक/कवी | पृ. क्र. |
|---|---|---|---|
| १. | शाळा (गाणे) | प्रल्हाद केशव अत्रे | १ |
| २. | तू हे करू शकतेस | -- | २ |
| ३. | आला पाऊस (कविता) | सुनीला गोंधळेकर | ६ |
| ४. | अनुभवी शेतकरी | यशवंत सुरोशे | ९ |
| ५. | अरुणा असफ अली | डॉ. इंदुमती यार्दी | १३ |
| | • आम्ही सूचनाफलक वाचतो. | -- | १५ |
| ६. | मधमाशी (कविता) | -- | १६ |


## भाग – २


| अ. क्र. | पाठाचे नाव | लेखक/कवी | पृ. क्र. |
|---|---|---|---|
| ७. | ताईस पत्र | -- | १९ |
| ८. | बक्षीस | स्मिता सराफ | २२ |
| ९. | सदैव सैनिका, पुढेच जायचे (कविता) | वसंत बापट | २७ |
| | • आम्ही बातमी वाचतो. | -- | ३० |
| १०. | माणुसकी आणि मोठेपणा | शंकर कवळे | ३१ |
| | • आम्ही जाहिरात वाचतो. | -- | ३५ |
| ११. | ई-मेल (कविता) | निर्मला सारडा | ३६ |
| १२. | संतवाणी | संत सावता,<br>संत बहिणाबाई | ३८ |

# १. शाळा

- ऐका. वाचा. म्हणा.




ही आवडते मज मनापासुनी शाळा ।
लाविते लळा ही जसा माउली बाळा ।।

हासऱ्या फुलांचा बाग जसा आनंदी ।
ही तशीच शाळा मुले इथे स्वच्छंदी ।।

हासुनी हसवुनी, खेळुनी, सांगुनी गोष्टी ।
आम्हांस आमुचे गुरुजन शिक्षण देती ।।

हे प्रेम कराया किती भोवती भाऊ ।
हातांत घालुनी हात तयांच्या राहू ।।

येथेच बंधूप्रेमाचे, घ्या धडे ।
मग देशकार्य करण्याला, व्हा खडे ।।

पसरवा नाव शाळेचे, चहूकडे ।
मग लोक बोलतील धन्य धन्य ती शाळा ।
जी देशासाठी तयार करिते बाळा ।।

**प्रल्हाद केशव अत्रे (केशवकुमार)** (१८९८–१९६९) : प्रसिद्ध शिक्षणतज्ज्ञ, नाटककार, कवी, चित्रपट कथालेखक. 'साष्टांग नमस्कार', 'घराबाहेर', 'उद्याचा संसार', 'मी उभा आहे' ही नाटके; 'झेंडूची फुले' हा विडंबनपर कवितासंग्रह; 'मी कसा झालो', 'सिंहगर्जना', 'सूर्यास्त', 'कऱ्हेचे पाणी' ही पुस्तके प्रसिद्ध. 'तो मी नव्हेच', 'मोरूची मावशी', 'प्रीतिसंगम' ही त्यांची नाटके रंगभूमीवर प्रचंड लोकप्रिय ठरली.

प्रस्तुत गीतातून शाळेविषयीचे प्रेम, जिव्हाळा व कृतज्ञतेची भावना कवीने व्यक्त केली आहे.

**शिक्षकांसाठी :** विद्यार्थ्यांकडून गटांत तसेच वैयक्तिकरीत्या गाणे तालासुरांत, साभिनय म्हणून घ्यावे. विद्यार्थ्यांना गाणे, समूहगीते यांच्या ध्वनिफिती ऐकवाव्या.

# २. तू हे करू शकतेस


प्रस्तुत पाठातील धनंजय नावाचा मुलगा नेहमी दुसऱ्यांना मदत करायचा; पण त्या मदतीच्या मोबदल्यात काहीतरी मिळण्याची अपेक्षा ठेवायचा. त्याचे हे वागणे कसे चुकीचे आहे, हे त्याच्या आजीने व बहिणीने आपल्या वर्तनातून त्याला पटवून दिले. आत्मविश्वास व चिकाटी हे गुण सतत नवनवे शिकण्यासाठी आवश्यक असतात, हे या पाठात दर्शवले आहे.

आज दिशा आणि धनंजय खूप आनंदात होते, कारण त्यांची आजी गावाहून येणार होती. गावाहून येताना आजी नेहमी मुलांसाठी घरी बनवलेला खाऊ, शेतातली फळे घेऊन यायची. त्यांना आवडणारे पदार्थ बनवून खाऊ घालायची. त्यांचे खूप कोडकौतुक करायची.

धनंजय अभ्यासात खूप हुशार होता. तो नियमित अभ्यास करायचा. सगळ्या उपक्रमांमध्ये, स्पर्धांमध्ये भाग घ्यायचा. वर्गात दिलेले सर्व प्रकल्प पूर्ण करायचा. संगणक व विविध पुस्तकांच्या मदतीने तो वैविध्यपूर्ण माहिती तसेच चित्रेही मिळवायचा. तो नेहमी दिशाला तिच्या शाळेच्या कामात मदत करायचा; पण केलेल्या मदतीच्या बदल्यात तिच्याकडून काहीतरी घ्यायचा. शाळेतही त्याला कोणी मदत मागितली, तर त्या बदल्यात तो मदत मागणाऱ्याकडून अपेक्षा करायचा.

एके दिवशी दिशाला विज्ञान प्रकल्प पूर्ण करायचा होता. तिने धनंजयची मदत मागितली. त्या बदल्यात त्याने तिचा जेवणाचा नवा डबा मागितला. तिने नकार दिला, तेव्हा तो दिशाला म्हणाला, ''ठीक आहे, मग एकटीच प्रकल्प पूर्ण कर. मी चाललो खेळायला.'' त्याला माहीत होते, की आपली छोटी बहीण आपल्याशिवाय प्रकल्प पूर्ण करू शकणार नाही. धनंजयचे बोलणे ऐकून दिशाच्या डोळ्यांत पाणी आले. आजी सोफ्यावर बसून हे पाहत होती. आजी तिला म्हणाली, ''दिशा, तू दुसऱ्यांवर विसंबून राहत जाऊ नकोस. धनू स्वत:ची कामे स्वत: करतो, म्हणून त्याच्यात आत्मविश्वास आहे. तुलाही तुझ्यातील क्षमतांवर विश्वास ठेवायला पाहिजे. चल, मी तुला प्रकल्प सुरू करायला मदत करते.''

संध्याकाळी धनंजय खेळून आला, तेव्हा त्याला खूप नवल वाटले, कारण दिशा तिचा प्रकल्प पूर्ण करत होती. रात्रीच्या जेवणापर्यंत तिने आपला प्रकल्प पूर्ण केला. दिशाला स्वत:चाच खूप अभिमान वाटत होता. दुसऱ्या दिवशी वर्गातही सर्वांनी तिच्या प्रकल्पाचे कौतुक केले.



**शिक्षकांसाठी :** वरील कथेतील प्रसंगासारख्या एखाद्या प्रसंगावर विद्यार्थ्यांना गटात चर्चा करायला लावावी. त्यांना आपले अनुभव सांगण्यासाठी प्रवृत्त करावे.

त्याच्याच पुढच्या आठवड्यात त्यांच्या आळीत रांगोळी स्पर्धेचे आयोजन केले होते. आळीतील सर्व मुलेमुली त्यात सहभागी होणार होती. दिशानेही त्यात भाग घेतला होता. यापूर्वी कधीही तिने अशा स्पर्धेत पारितोषिक मिळवले नव्हते. धनंजय दरवर्षी रांगोळी स्पर्धेत नंबर काढायचा. आजीला जेव्हा या रांगोळी स्पर्धेबद्दल समजले, तेव्हा ती दिशाला म्हणाली, ''तू आतापासूनच रांगोळी काढायचा सराव कर. कोणतं चित्र काढायचं ते ठरव. रंगसंगतीचा विचार कर.'' दिशा आजीला म्हणाली, ''आजी, तू मला ठिपक्यांची रांगोळी काढायला आणि त्यात रंग भरायला शिकवशील का?'' त्यावर आजी तिच्या डोक्यावरून हात फिरवत म्हणाली, ''जरूर शिकवीन. तू खूप मेहनती आहेस. तुझ्यात नवंनवं शिकण्याची चिकाटी आहे. दिशा, नक्कीच तू हे करू शकतेस. तुला लवकरच सुंदर रांगोळी काढता येईल.'' आठवडाभराच्या निरंतर सरावाने दिशामध्ये आत्मविश्वास आला. ती रांगोळी स्पर्धेसाठी सज्ज झाली.


धनंजयने रांगोळी स्पर्धेत निसर्गचित्र काढले, तर काहींनी फुलांची रांगोळी, धान्याची रांगोळी व मुक्तहस्त रांगोळी काढली. दिशाने ठिपक्यांची पारंपरिक पद्धतीची रांगोळी काढली. रांगोळी स्पर्धेच्या परीक्षकांनी आपला निकाल जाहीर करताना दिशाच्या रांगोळीचे खूप कौतुक केले. दिशाला रांगोळी स्पर्धेतील पारितोषिक मिळाले. जेव्हा धनंजयने तिची रांगोळी पाहिली, तेव्हा त्याला आपल्या बहिणीचा अभिमान वाटला.

घरी आल्यावर तो दिशाला म्हणाला, ''मला शिकवशील का ठिपक्यांची रांगोळी काढायला?'' दिशा हसून म्हणाली, ''हो जरूर शिकवीन; पण त्या बदल्यात तू मला काय देणार?''

धनंजयला स्वत:ची चूक जाणवली. तो म्हणाला, ''दिशा मला माफ कर. मला समजलं आहे, ज्यांना माझ्या मदतीची गरज पडायची त्यांचा मी सतत फायदा घेत होतो. यापुढे मी कधीही असं वागणार नाही आणि सगळ्यांना मदत करीन.'' त्याचे हे बोलणे ऐकून दिशा आनंदली. त्या दोघांचे हे बोलणे ऐकणाऱ्या आजीने आनंदाने आपल्या दोन्ही नातवंडांना कवेत घेतले.

**शब्दार्थ :** **कोडकौतुक करणे** – लाड पुरवणे. **वैविध्यपूर्ण** – विविध प्रकारचे. **नकार देणे** – नाही म्हणणे. **विसंबून राहणे** – इतरांवर अवलंबून राहणे. **पारितोषिक** – बक्षीस. **निरंतर** – नियमित. **सज्ज होणे** – तयार होणे. **पारंपरिक** – जुन्या पद्धती, परंपरेप्रमाणे. **कवेत घेणे** – मिठीत घेणे.

## स्वाध्याय



**प्र. १. खालील प्रश्नांची एक-दोन वाक्यांत उत्तरे लिहा.**

(अ) दिशा आणि धनंजय आनंदात का होते?


(आ) आजी आपल्या नातवंडांसाठी काय काय करत असे?

(इ) आजीने दिशाला कोणता सल्ला दिला?

(ई) धनंजयला स्वत:ची चूक जाणवल्यावर त्याने काय ठरवले?

**प्र. २. खालील आकृती पूर्ण करा.**

धनंजयला हे सर्व करायला आवडायचे.



**प्र. ३. 'केव्हा' ते लिहा.**

(अ) दिशा रांगोळीच्या स्पर्धेसाठी सज्ज झाली.

(आ) धनंजयला स्वत:ची चूक जाणवली.

(इ) आजीने दोन्ही नातवंडांना कवेत घेतले.

**प्र. ४. जर तुम्हांला कोणी मदत केली, तर त्याच्याबद्‌दल तुमच्या मनात कोणते विचार येतात, ते थोडक्यात लिहा.**



**चर्चा करा. सांगा.**

- कोणतीही नवीन गोष्ट शिकण्यासाठी कोणकोणत्या गोष्टी आवश्यक असतात, याबाबत मित्रांशी चर्चा करा.

**खेळूया शब्दांशी.**

**(अ) खाली दिलेल्या कंसातील शब्दांचा वापर करून वाक्ये पूर्ण करा.**

(वैविध्यपूर्ण, आत्मविश्वास, कवेत)

(अ) स्वत:ची कामे स्वत: केल्यास आपल्यात············ येतो.

(आ) लहान बाळाच्या बाललीला पाहून आईने बाळाला············ घेतले.


(इ) आमच्या शाळेत············ उपक्रम चालतात.

**(आ) खालील चौकटी पूर्ण करा.**

| अक्षर | फूल | फळ | मुलगी | मुलगा | भाजी | गाव | पक्षी/प्राणी | पदार्थ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| प | पारिजातक | पपई | परवीन | पराग | पालक | परंडा | पोपट | पुरणपोळी |
| क | ········ | ········ | कुसुम | ········ | ········ | ········ | कावळा | ········ |
| च | ········ | ········ | ········ | चंद्रकांत | चुका | ········ | ········ | चकली |
| स | सदाफुली | सफरचंद | ········ | ········ | ········ | सटाणा | ········ | ········ |

**खेळ खेळूया.**

- **'प' चा शब्दपंखा पूर्ण करा.**




(१) सप्तसुरांतील पाचवा स्वर.

(२) आकाशात पंखांच्या साहाय्याने उडणारे.

(३) वाऱ्याचा एक समानार्थी शब्द.

(४) कुटुंबाला असेही म्हणतात.

(५) यामध्ये पीठ मळले जाते.

(६) संदेशवहनाचे एक साधन.

(७) वर्णमालेतील एकविसावे अक्षर.

DFT3FA

## आपण समजून घेऊया.

● मागील इयत्तेत आपण नाम, सर्वनाम, विशेषण व क्रियापद या विकारी शब्दप्रकारांचा अभ्यास केला आहे. या इयत्तेत आपण अविकारी शब्दप्रकारांचा अभ्यास करणार आहोत. क्रियाविशेषण अव्यये, शब्दयोगी अव्यये, उभयान्वयी अव्यये व केवलप्रयोगी अव्यये या शब्दप्रकारांना अविकारी म्हणतात, कारण लिंग, वचन, विभक्ती इत्यादींचा त्यांच्यावर परिणाम होऊन त्या शब्दप्रकारांतील शब्दांच्या रुपांमध्ये काही बदल होत नाही.

● **खालील वाक्ये वाचा.**

(अ) मोहन पहाटे उठून पळायला जातो.

(आ) सभोवार जंगल होते.

(इ) ताई झटकन उठली.

(ई) रस्त्याने चालताना राजू नेहमी अडखळतो.

वरील वाक्यांतील अधोरेखित केलेले पहाटे, सभोवार, झटकन व नेहमी हे शब्द क्रियाविशेषण अव्यये आहेत. हे शब्द वाक्यातील क्रियापदाबद्दल विशेष माहिती देतात. वाक्यातील क्रियापदाबद्दल विशेष माहिती देणारे शब्द **क्रियाविशेषण अव्यये** असतात. वाक्यांतील क्रिया कधी घडली, कुठे घडली, कशी घडली, किती वेळा घडली यांवरून वाक्यांतील क्रियाविशेषण अव्ययांचे प्रकार ओळखता येतात.

### क्रियाविशेषण अव्ययांचे प्रकार



**सूर्य दररोज पूर्वेला उगवतो.**

**– कालवाचक क्रियाविशेषण अव्यये**

उदा., आधी, सध्या, हल्ली, सदा, उद्या, नित्य, वारंवार इत्यादी.



**कासव सावकाश चालते.**

**- रीतिवाचक क्रियाविशेषण अव्यये**

उदा., पटकन, पटपट, जलद, आपोआप इत्यादी.



**पक्ष्यांचा थवा वर उडत आहे.**

**– स्थलवाचक क्रियाविशेषण अव्यये**

उदा., सर्वत्र, इथे, जिथे, जिकडे, खाली, मागे, अलीकडे इत्यादी.



**सीमा भरपूर पाणी पिते.**

**– परिमाणवाचक/संख्यावाचक क्रियाविशेषण अव्यये**

उदा., किंचित, काहीसा, अत्यंत, मुळीच, मोजके इत्यादी.

● **खाली दिलेल्या शब्दांचे क्रियाविशेषण अव्ययांच्या प्रकारानुसार चौकटीत वर्गीकरण करा.**

परवा, समोरून, जरा, कसे, वर, थोडा, सतत, झटकन, तिथे, दररोज, टपटप, क्षणोक्षणी, सावकाश, पलीकडे, अतिशय, पूर्ण.

| कालवाचक क्रियाविशेषण अव्यये | स्थलवाचक क्रियाविशेषण अव्यये | रीतिवाचक क्रियाविशेषण अव्यये | परिमाणवाचक / संख्यावाचक क्रियाविशेषण अव्यये |
|---|---|---|---|
| | | | |

**शिक्षकांसाठी :** क्रियाविशेषण अव्यये व त्यांचे प्रकार यांची विविध उदाहरणे देऊन विद्यार्थ्यांकडून अधिकाधिक सराव करून घ्यावा. क्रियाविशेषण अव्ययांचा वापर करून वाक्ये तयार करण्यास सांगावे.

# ३. आला पाऊस

• ऐका. वाचा. म्हणा.



छपराखाली कुणी लाविले अगणित इवले दिवे,
पागोळ्यांतुन झरझर कैसी ज्योत ज्योत उजळे.

ठिपके ठिपके थेंब जोडुनी रंगावली सजविती,
रांगोळीत या इंद्रधनुचे रंग कसे पसरती.

मखमल हिरव्या दाट तृणांची मधेच पांघरलेली,
तृणपुष्पांची नाजुक पखरण नक्षीदार सजलेली.

टपटप टपटप संगीतधून ही दाही दिशातून,
छपरावरती तबला होउन वाजवितो कोण?

वर्षाऋतुचा दिव्य सोहळा हिरव्या रंगातून,
धरणी करिते असा साजरा उत्सव ओथंबून.

DG2VGX


**सुनीला गोंधळेकर** (जन्म–१९६८): आकाशवाणी, वृत्तपत्रे तसेच विविध मासिकांमधून लेखन.

धरणीला सजवणारा व फुलवणारा ऋतू म्हणजे 'वर्षाऋतू'. पावसाळ्यात पडणाऱ्या पावसाचे मनमोहक वर्णन प्रस्तुत कवितेतून कवयित्रीने केले आहे.

**शिक्षकांसाठी :** पाठ्यपुस्तकातील सर्व कविता तालासुरांत आनंददायी पद्धतीने विद्यार्थ्यांकडून म्हणून घ्याव्या.

**शब्दार्थ :** **अगणित** – असंख्य. **इवले** – लहान, छोटे. **पागोळ्या** – छपरावरून खाली पडणाऱ्या पावसाच्या पाण्याच्या धारा. **तृण** – गवत. **पुष्प** – फूल. **पखरण** – सडा. **वर्षा** – पाऊस. **सोहळा** – उत्सव, सण. **धरणी** – जमीन.

## स्वाध्याय



**प्र. १. खालील प्रश्नांची एक–दोन शब्दांत उत्तरे लिहा.**

(अ) अगणित दिवे कोठे लागले आहेत?

(आ) रंगावली कशी सजली आहे?

(इ) धरणीने कशाची मखमल पांघरली आहे?

(ई) धरणी कोणता सोहळा साजरा करत आहे?

**प्र. २. खालील शब्दांसाठी कवितेत कोणते पर्यायी शब्द आले आहेत ते लिहा.**

(अ) पावसाचे थेंब (इ) रांगोळी

(आ) हिरवे दाट गवत (ई) थेंबांचा टपटप आवाज

**प्र. ३. खालील अर्थाच्या ओळी कवितेतून शोधून लिहा.**

(अ) पावसाचे एकसारखे पडणारे थेंब रांगोळीसारखे दिसत आहेत. त्यांत इंद्रधनुष्याचे रंग मिसळलेले आहेत.

(आ) छपरावर पडणाऱ्या पावसाच्या थेंबांचा आवाज म्हणजे संगीताची धून आहे. जणूकाही पाऊस छपरावर तबला वाजवतो आहे.

**प्र. ४. ऋतूंची वैशिष्ट्ये सांगणारा तक्ता पूर्ण करा.**

| उन्हाळा ऋतू | पावसाळा ऋतू | हिवाळा ऋतू |
|---|---|---|
| (अ) झाडाची पाने गळतात. | (अ) पाऊस पडतो. | (अ) हवेत गारवा असतो. |
| (आ) | (आ) | (आ) |
| (इ) | (इ) | (इ) |



**चर्चा करा. सांगा.**

- **पाऊस पडून गेल्यानंतर सृष्टीत कोणकोणते बदल होतात? निरीक्षण करा. गटात चर्चा करा.**

**खेळूया शब्दांशी.**

**(अ) खालील नामांना कवितेत आलेली विशेषणे शोधून लिहा.**

(अ) दिवे (आ) तृण (इ) पखरण (ई) सोहळा


**(आ) खालील शब्दांसाठी शेवट समान असणारे कवितेतील शब्द लिहा.**


(अ) सजविती (आ) पांघरलेली (इ) रंगातून


**प्रकल्प :**

आंतरजालाच्या साहाय्याने विविध कवी, कवयित्री यांची 'पाऊस' या विषयावरील गीते मिळवून त्यांचा संग्रह करा.

## कविता करूया.




वरील आकृत्यांमध्ये गोलात दिलेल्या शब्दांशी संबंधित काही शब्द दिलेले आहेत. त्या शब्दांचे निरीक्षण करा. यांमध्ये शेवट समान असणारे काही शब्द आहेत.

उदा., वारा, धारा, गारा
पक्षी, नक्षी
पारवा, थवा

अशा शब्दांना यमक जुळणारे शब्द म्हणतात.

या शब्दांचा वापर करून आपल्याला लयबद्ध वाक्ये तयार करता येतात.

उदा., सुटला गार वारा,
पडू लागल्या गारा,
पावसाच्या धाराच धारा,
होई सर्वत्र चिखल सारा.

याप्रमाणे वरील आकृत्यांमध्ये दिलेल्या इतर शब्दांचा उपयोग करून कवितेच्या ओळी तयार करा.

## वाचा.



- **खालील उतारा वाचा. त्यास योग्य शीर्षक द्या.**

ऋतुबदल हा निसर्गाचा नियम आहे. ऋतुमानानुसार सृष्टिसौंदर्यात होणारे परिवर्तन विलोभनीय असते. प्रत्येक ऋतूची अशी काही वैशिष्ट्ये असतात, जी मनाला मोहिनी घालतात; पण सर्व ऋतूंत मनाला भुरळ घालतो तो वसंतऋतू.

वसंतऋतूत फुलांचा साज, त्यांचे वैभव अवर्णनीय असते. आम्रवृक्षावर आलेल्या पोपटी-हिरवट मोहोराच्या घमघमाटाने सारा परिसर सुगंधित होतो. गुलाब, जाई, जुई, जास्वंद, चाफा अशा कितीतरी फुलांच्या उमलण्याने वातावरणात एक उल्हास जाणवतो. सगळीकडे पांढरी, जांभळी, केशरी, लालसर, पिवळसर, गुलाबी अशा कितीतरी रंगांची व रंगछटांची फुले वसंतोत्सव साजरा करायला उत्सुक होतात. त्या फुलांच्या लडी, घोस, तुरे नयनसुखाबरोबर मनही ताजेतवाने करून जातात. गुलमोहोर, पिंपळ, कडुनिंब, शिरीष अशा कितीतरी झाडांची पोपटी, तांबूस, सोनेरी, तपकिरी कोवळी पाने पाहून मन वेडावून जाते. वसंतऋतूला **ऋतुराज** का म्हणतात, हे निसर्गाचे वैभव पाहूनच समजते.

## आपण समजून घेऊया.

(अ) मुले जेवताना आनंदी होती.

(आ) मुलांना बागेत खेळायला मजा आली.

वाक्य पूर्ण झाल्यावर '.' असे चिन्ह दिले जाते. या चिन्हाला **पूर्णविराम** म्हणतात.

**शिक्षकांसाठी :** वरील उताऱ्याचे विद्यार्थ्यांकडून समजपूर्वक प्रकट वाचन करून घ्यावे. निसर्गात घडणाऱ्या विविध बदलांचे निरीक्षण करण्यास सांगावे. विद्यार्थ्यांनी अनुभवलेले प्रसंग वर्गात सांगण्यास प्रोत्साहन द्यावे.

# ४. अनुभवी शेतकरी

**यशवंत सुरोशे** (जन्म-१९७८) : विविध वृत्तपत्रे व मासिकांमधून लेखन.

रामरावांनी आपल्या मुलांना कष्टाचे महत्त्व पटावे, म्हणून केलेली युक्ती कशी यशस्वी झाली, याचे वर्णन प्रस्तुत पाठात लेखकाने केले आहे.

आयुष्यभर काबाडकष्ट करून रामरावांनी आठ एकरांची शेती स्वत:च्या मालकीची केली. एकीकडे शून्यातून विश्व निर्माण केल्याचा आनंद रामरावांच्या मनात होता, तर दुसरीकडे आपली तिन्ही मुले नीट शिकली नाहीत आणि शेतीच्या कामाला हातभार लावत नाहीत या चिंतेने त्यांचे मन ग्रासले होते. उतारवयामुळे आता कामही होत नव्हते. त्यात मनाच्या या रोगाला कोणतेच औषध लागू पडत नव्हते. बिछान्यावर पडलेल्या रामरावांच्या डोळ्यांसमोर आठ एकरांचा हिरवागार पट्टा ओसाड पडल्याचे दु:स्वप्न तरळून जायचे. जीव घाबराघुबरा व्हायचा; पण तिन्ही मुलांना फिकीर नव्हती. बावीस-पंचवीस वर्षांचे हे तगडे तरुण गावभर हिंडत, गप्पा मारत आणि फक्त जेवायला घरी वेळेवर येत. रामरावांना काय करावे हेच कळेना.

एके दिवशी डॉक्टरांकडे जाण्याच्या उद्देशाने रामराव घराबाहेर पडले. दवाखान्यात न जाता पेठेतल्या एकमेव बँकेत गेले. बँकेच्या व्यवस्थापकांशी अर्धा तास चर्चा केली नि परत घरी आले.

रात्री रामरावांच्या पत्नीने सर्वांना जेवायला बोलावले. जेवणापूर्वी रामराव मुलांना म्हणाले, ''मुलांनो, आता मी थकलोय. माझ्याच्यानं ही शेतीवाडीची कामं होणार नाहीत. तुम्हांलाही शेतीची कामं करायला कमीपणा वाटतो. बँकेत मी तुमच्यासाठी कर्जाची सोय करून आलोय. तुम्हांला प्रत्येकाला पाच लाख रुपये कर्ज मिळेल. त्यातून तुम्ही पोटापाण्याचा



**शिक्षकांसाठी :** विद्यार्थ्यांकडून ही कथा प्रसंगानुसार वाचून घ्यावी. या कथेचे विद्यार्थ्यांकडून साभिनय सादरीकरण करून घ्यावे. वर्तमानपत्रे, मासिके यांमध्ये आलेल्या विविध कथांचा संग्रह करून त्यांचे विद्यार्थ्यांकडून समजपूर्वक प्रकट वाचन करून घ्यावे.

धंदा करा. कर्जासाठी जमीन गहाण ठेवायचं ठरवलंय. फक्त तुम्ही एक काम करा, गावातल्या बँकेच्या नियमाप्रमाणे प्रत्येकानं दहा हजार रुपये भरून आपापलं कर्जखातं बँकेत काढा. कागदपत्रांची जमवाजमव मी केली आहे.''

मुलांना खूप आनंद झाला. प्रत्येकाच्या डोळ्यांसमोर पाच लाखांचा आकडा तरळत होता. त्यानंतर हे दहा हजार कोठून आणायचे, असा प्रत्येक जण विचार करू लागला. त्या रात्री तिन्ही मुले बराच वेळ चर्चा करत एकत्र बसली.

दुसऱ्या दिवशी सकाळी कुठेतरी पेठेत, मित्रांकडे उसनवारी करण्यासाठी गेली; पण कोणाचेच काम झाले नाही. रामराव या सर्वांचा कानोसा घेत होते. दुपारच्या वेळी तिन्ही मुले रामरावांचा निरोप घ्यायला आली. ''आम्ही शहरात चाललो आहोत. महिनाभरानं दहा-दहा हजार रुपये कमवून आणू, तेव्हाच घरी परतू.'' एवढे बोलून, तिघे पाठीवरच्या पिशव्या सांभाळत गेलेसुद्धा.

शहरात त्या तिघांना कोणीही महिना दहा हजार रुपये पगाराने नोकरीवर ठेवले नाही. मोठ्या मुलाला किराणा मालाच्या दुकानात सात हजार रुपये पगाराची नोकरी मिळाली. मधल्याला हॉटेलमध्ये स्वच्छता करण्याची पाच हजार रुपये पगाराची नोकरी मिळाली. धाकटा मुलगा दिवसभर फिरून कुठेच नोकरी मिळत नाही, म्हणून बसस्थानकामधल्या रसवंतिगृहात सहा हजार रुपयांच्या पगारावर नोकरीस राहिला.

पहिल्याच दिवशी खूप भूक लागली, म्हणून थोरल्याने पोत्यातले मूठभर शेंगदाणे उचलले नि तोंडात टाकले. हे मालकाने पाहिले. थोरल्याला कडक शब्दांत सुनावले. त्याचा अपमान केला. थोरल्याला घरातल्या कोपऱ्यात भरलेल्या शेंगांची पोती आठवू लागली. खाली मान घालून तो पोती उचलू लागला. मधल्या मुलाची तर हॉटेलातील साफसफाई करून पुरती वाट लागली. दिवसभर हात ओले राहिल्यामुळे पांढरेफटक पडले. नाकाला हॉटेलमधल्या पदार्थांचा वास नकोसा झाला. त्याला आपल्या वावरातला पाट आठवू लागला. 'खळखळ पाण्याचा पाट साऱ्या पिकाला पाणी पाजत पुढे जातो. निर्मळ, नितळ पाणी, हिरवं शेत पाहून मनाला तरतरी येते आणि इथे... यापेक्षा शेताला पाणी देणं सोपं!' असा विचार करून तो काम करत राहिला. धाकट्याचीही परिस्थिती फार वेगळी नव्हती. उसाच्या रसाचे पैसे पाहून त्याला आपल्या मळ्यातला ऊस आठवला नसता तरच नवल! गावाहून येणाऱ्या माणसांना टाळत तो तिथे काम करू लागला. उसाच्या मोळ्या वाहताना दमछाक होई. एवढेच काम आपण घरी केले असते तर... असा विचार त्याच्या मनात येऊन गेला.

त्या पहिल्या रात्री तिघांनी फोनवरून एकमेकांना आपापली नोकरी कशी छान आहे, आरामशीर आहे, असे खोटेखोटेच सांगितले. इकडे रामराव व त्यांची पत्नी आपल्या मुलांच्या विचाराने व्याकूळ झाले होते. रामराव पत्नीला धीर देत म्हणायचे, ''अगं, मुलं काय वनवासाला नाही गेली. त्यांच्या पंखांची ताकद नको का अजमावायला? मीच शक्कल लढवली आहे ही.''

एक महिन्यानंतर, एके दिवशी तिघेही मुले अगदी अशक्त होऊन, थकून घरी आली. रामराव नुकतेच शेतावरून आले होते. मुलांच्या दुर्मुखलेल्या चेहऱ्यांकडे पाहून त्यांना दया आली; पण ते काहीच बोलले नाहीत. शेवटी मुलेच म्हणाली, ''बाबा, आम्ही चुकलो. एका महिन्यात दहा हजार रुपये आम्ही कमवू शकलो नाही. आम्हांला माफ करा.''



थोरला म्हणाला, ''बाबा, माझ्या लक्षात आलंय, की बाहेर इतके कष्ट करण्यापेक्षा आपल्याच शेतात आम्ही राबलो तर अधिक पैसे मिळतील.'' ''शिवाय आपल्या मर्जीप्रमाणे नि सवडीप्रमाणे काम करायला मिळेल'', धाकटा म्हणाला. ''तुमच्या, घराच्या, गुरांच्या, पिकांच्या सहवासात राहता येईल. पैसेपण मिळतील, प्रेमही मिळेल.'' मधला हळहळत बोलला. ''उद्यापासून आम्ही तिघंही आपल्या शेतातच राबू नि शिवार फुलवू. नको आम्हांला कर्ज नि पैसे. तुम्ही फक्त आम्हांला मार्गदर्शन करा.'' तिघेही बोलले.

रामराव व त्यांच्या पत्नीच्या डोळ्यांत पाणी आले. रामराव पुढे होत म्हणाले, ''मुलांनो ! शहरात नोकरी मिळवण्यापेक्षा तुमची कष्ट करण्याची क्षमता तुम्ही नक्कीच ओळखली आहे. बाळांनो, हेच मी तुम्हांला सांगत होतो. आपली स्वत:ची पिकाऊ जमीन असताना का इकडे तिकडे भटकायचं? हातचं सोडून पळत्याच्या मागं लागायचं? न लाजता शेतीची कामं करा, स्वाभिमानानं जगा. या काळ्या आईची जितकी सेवा कराल, तितका फायदा तुम्हांला होईल. हा माझा अनुभव आहे.''

मुलांनी माना डोलावल्या. त्यांच्या डोळ्यांतला आत्मविश्वास पाहून रामराव मनोमन निश्चिंत झाले.

**शब्दार्थ :** **हातभार लावणे** – मदत करणे. **चिंतेने मन ग्रासणे** – काळजी वाटणे. **दु:स्वप्न** – वाईट स्वप्न. **फिकीर नसणे** – काळजी नसणे. **सुनावणे** – ऐकवणे. **वावर** – शेत. **दमछाक होणे** – खूप थकणे. **दुर्मुखलेला चेहरा** – उदास चेहरा. **हळहळत बोलणे** – वाईट वाटून बोलणे. **निश्चिंत होणे** – चिंतामुक्त होणे.

## स्वाध्याय



### प्र. १. का ते लिहा.

(अ) रामरावांचे मन चिंतेने ग्रासले होते.

(आ) किराणा दुकानाचे मालक थोरल्याला रागावले.

(इ) धाकट्या मुलाला मळ्यातला ऊस आठवला.

(ई) रामराव मनोमन निश्चिंत झाले.

### प्र. २. खालील आकृती पूर्ण करा.

रामरावांच्या मुलांनी शहरात केलेली कामे

| थोरला मुलगा | मधला मुलगा | धाकटा मुलगा |
|---|---|---|
| | | |

### प्र. ३. खाली दिलेल्या उदाहरणाप्रमाणे दिलेल्या वाक्यांवरून प्रश्न तयार करा.

उदाहरणार्थ, **वाक्य–** रामरावांनी कागदपत्रांची जमवाजमव केली.

**प्रश्न–** (१) रामरावांनी कशाची जमवाजमव केली? (२) कागदपत्रांची जमवाजमव कोणी केली?

याप्रमाणे पुढे दिलेल्या वाक्यांच्या आधारे प्रश्न तयार करा.

(१) थोरल्याने पोत्यातले मूठभर शेंगदाणे उचलले.

(२) रामराव शेतावरून घरी आले होते.



## चर्चा करा. सांगा.

- रामरावांनी बँकेच्या व्यवस्थापकांशी काय चर्चा केली असेल, याची कल्पना करून त्या दोघांतला संवाद वर्गात सादर करा.
- या पाठातून तुम्हांला कोणता संदेश मिळाला त्याबाबत मित्रांशी चर्चा करा.

## खेळूया शब्दांशी.

**(अ) खालील वाक्प्रचार व त्यांचे अर्थ यांच्या योग्य जोड्या लावा.**

| वाक्प्रचार | अर्थ |
|---|---|
| (अ) शून्यातून विश्व निर्माण करणे. | (१) युक्ती करणे. |
| (आ) कानोसा घेणे. | (२) प्रतिकूल परिस्थितीत मोठे यश साध्य करणे. |
| (इ) जीव घाबराघुबरा होणे. | (३) चाहूल घेणे. |
| (ई) शक्कल लढवणे. | (४) खूप घाबरणे. |

**(आ) एकाच अर्थाचे दोन शब्द एकत्र येऊन तयार झालेले खालील शब्द वाचा. यांसारख्या आणखी जोडशब्दांची यादी तयार करा.**

दंगामस्ती, चेष्टामस्करी, धनदौलत, काबाडकष्ट, अक्कलहुशारी.

**(इ) खालील शब्द अभ्यासा. एका शब्दाचे संदर्भानुसार वेगवेगळे अर्थ होतात. यांसारखे आणखी शब्द शोधा व त्यांचे अर्थ लिहा.**

उदा., (१) **वावर** = ये-जा करणे (२) **पाट** = शेतातील पाण्याचा ओहोळ

**वावर** = शेत **पाट** = बसण्याचे आसन

**(ई) खालील शब्द वाचा. वहीत लिहा.**

गृहपाठ, पृथ्वी, कृती, आकृती, तृण, शृंखला, वृषाली, कृतज्ञ, मृदा.

**उपक्रम :**

(अ) शेतीसाठी वापरल्या जाणाऱ्या अवजारांची चित्रे गोळा करा. वहीत चिकटवा. प्रत्येक चित्राखाली त्याचे नाव व उपयोग लिहा.

(आ) तुमच्या गावात शेतीविषयक प्रदर्शन भरल्यास त्या प्रदर्शनाला पालकांसोबत भेट द्या. प्रदर्शनात असणाऱ्या वस्तूंची यादी करा.

## आपण समजून घेऊया.

(अ) सीता, समीरा, नफीसा खूप चांगल्या मैत्रिणी आहेत.

(आ) बाबांनी दुकानातून रमेशसाठी वही, पेन, कंपासपेटी आणली.

वाक्य वाचताना विशिष्ट शब्दानंतर आपण थोडे थांबतो, तेव्हा त्या शब्दानंतर ',' असे चिन्ह दिले जाते. या चिन्हाला **स्वल्पविराम** म्हणतात.

# ५. अरुणा असफ अली

**डॉ. इंदुमती यार्दी** (१९२६-२०१५): प्रसिद्ध लेखिका. 'भारतरत्न' हे पुस्तक प्रसिद्ध.

भारतकन्या अरुणा असफ अली यांनी देशाच्या राजकारणात व समाजकारणात सक्रिय सहभाग घेतला. भारतीय स्वातंत्र्यलढ्याच्या इतिहासात त्यांना 'क्रांतिज्वाला' म्हणून ओळखले जाते. त्यांच्या विविधांगी कार्याचा परिचय प्रस्तुत पाठात करून दिला आहे. सदर पाठ 'भारतरत्न' या पुस्तकातून घेतलेला आहे.



**अरुणा असफ अली**

अरुणा असफ अली यांनी वयाच्या एकविसाव्या वर्षी स्वातंत्र्यसंग्रामात उडी घेतली. त्यांनी देशाच्या स्वातंत्र्यप्राप्तीसाठी आपले उभे आयुष्य वेचले. समाजाच्या उन्नतीसाठी अपार परिश्रम घेतले. भारतकन्या अरुणा असफ अली यांनी देशाच्या राजकारणात हिरिरीने भाग घेतला, तर समाजकारणात पुढाकार घेऊन देशाची उत्तम सेवा केली. भारतीय स्वातंत्र्यलढ्याच्या इतिहासात 'क्रांतिज्वाला' म्हणून त्या ओळखल्या जातात.

त्यांचे कार्य विविधांगी असून त्यांच्या कामाचा आवाका प्रचंड होता. कोणतेही काम तत्परतेने, नि:स्वार्थी वृत्तीने व निश्चयी बाण्याने पार पाडण्याची जबरदस्त ताकद त्यांच्या ठायी होती. पारतंत्र्यातून देशाची मुक्ती हा त्यांच्या आयुष्याचा ध्यास होता. सन १९४२ च्या 'भारत छोडो' आंदोलनात अरुणाबाईंनी महत्त्वाची भूमिका बजावली होती. ९ ऑगस्ट १९४२ रोजी मुंबईतील गवालिया टँक येथे त्यांनी राष्ट्रध्वज फडकवला व नंतर भूमिगत होऊन स्वातंत्र्यलढ्यात सक्रिय राहिल्या. त्यांनी क्रांतिकारक तरुणांची मजबूत फळी उभी केली. 'चले जाव' चळवळ चालवण्यासाठी भूमिगत समिती स्थापन करण्यात आली. त्यात जयप्रकाश नारायण, अच्युतराव पटवर्धन, राम मनोहर लोहिया व अरुणाबाई ही मंडळी होती. या मंडळींनी भारतीय लोकांच्या मनात इंग्रज सरकारविरुद्ध जबरदस्त विरोध निर्माण केला. अरुणाबाईंना पकडण्यासाठी इंग्रज सरकारने बक्षीस जाहीर केले होते. पोलिसांचा ससेमिरा चुकवत त्यांनी क्रांतीचा संदेश सर्वदूर पसरवला. देशाच्या स्वातंत्र्यासाठी त्यांनी अनेक वेळा तुरुंगवास भोगला.


अनेकांच्या प्रयत्नांमुळे १५ ऑगस्ट १९४७ साली आपला देश स्वतंत्र झाला. अरुणाबाईंच्या सार्वजनिक कामाचा व्याप प्रचंड होता. दिल्लीच्या पहिल्या महापौर म्हणून त्या निवडून आल्या. प्रौढ साक्षरता, रोजगार, वैद्यकीय सुविधा आदी योजना त्यांनी राबवल्या. त्यांचा समाजवाद, लोकशाही व धर्मनिरपेक्षता या तत्त्वांवर विश्वास होता. दिल्लीच्या गिरणी कामगारांना न्याय मिळवून देण्यासाठी व मजदूर युनियनला बळकटी आणण्यासाठी अरुणाबाईंनी पुढाकार घेतला. तुरुंगातील कैद्यांचे प्रश्न, तुरुंग सुधारणा अशा बाबींकडेही त्यांनी लक्ष पुरवले.

प्रत्यक्ष देशकार्य करत असताना त्यांनी कसल्याच गौरवाची अपेक्षा ठेवली नाही. 'भविष्यात भारतीयांनी मला देशभक्त म्हणून ओळखले तरी पुरेसे आहे.' अशी त्यांची भावना होती.

भारतीय स्वातंत्र्यसंग्रामात बजावलेल्या देदीप्यमान कामगिरीचा गौरव म्हणून अरुणा असफ अली यांना 'भारतरत्न' हा सर्वोच्च सन्मान १९९७ साली मरणोत्तर बहाल करण्यात आला.

**शब्दार्थ :** **आवाका** – शक्ती, सामर्थ्य. **बाणा** – अभिमान. **फळी उभी करणे** – समूहाला संघटित करणे. **ससेमिरा चुकवणे** – पाठलाग चुकवणे. **देदीप्यमान** – तेजस्वी, डोळे दिपवून टाकणारे.

## स्वाध्याय



**प्र. १. खालील प्रश्नांची एक–दोन वाक्यांत उत्तरे लिहा.**

(अ) कामाचा प्रचंड व्याप असूनही अरुणा असफ अली यांची कामे का पूर्ण होत ?

(आ) देशाच्या स्वातंत्र्यासाठी अरुणा असफ अली यांनी कोणता त्रास सहन केला ?

(इ) देशकार्य करताना त्यांच्या ठायी कोणती भावना होती ?

## खेळूया शब्दांशी.

**(अ) खाली दिलेल्या शब्दसमूहांबद्दल एक शब्द लिहा.**

(अ) राज्यकारभार करणारा–

(आ) आंदोलन करणारे–

(इ) क्रांती करणारे–

(ई) देशभक्ती करणारा–

**(आ) वाचा. समजून घ्या.**

(१) पंचवीस वर्षे– रौप्यमहोत्सव

(२) पन्नास वर्षे– सुवर्णमहोत्सव

(३) पंचाहत्तर वर्षे– अमृतमहोत्सव

(४) शंभर वर्षे– शतकमहोत्सव

## माहिती मिळवूया.



- आंतरजालाच्या साहाय्याने खालील मुद्द्यांची माहिती मिळवा.

(१) भारताच्या स्वातंत्र्यसंग्रामात भूमिगत राहून कार्य केलेल्या थोर व्यक्ती.

(२) आपल्या देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी झालेल्या चळवळी.

(३) ‘चले जाव’ चळवळ.

(४) ‘भारतरत्न’ या सर्वोच्च सन्मानाने सन्मानित झालेल्या व्यक्ती.

- **खालील वाक्यांत पूर्णविराम व स्वल्पविराम घालून वाक्ये पुन्हा लिहा.**

(अ) अन्वर स्वत:ची कामे स्वत: करतो

(आ) गुलाब मोगरा चाफा ही सुवासिक फुले आहेत

(इ) विनिता अनिता अस्मिता खूप चांगल्या मैत्रिणी आहेत

(ई) अजय सुरेश अंकुश मैदानावर खेळायला गेले

## ● आम्ही सूचनाफलक वाचतो.




● **वरील सूचनाफलकाच्या आधारे खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.**

(१) सूचना कशाच्या संदर्भात आहे?
(२) मोफत आरोग्य शिबीर कोणत्या ठिकाणी घेण्यात येणार आहे?
(३) कोणत्या तारखेला आरोग्य शिबीर आयोजित करण्यात आले आहे?
(४) कोणाच्या वतीने आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे?

### आपण समजून घेऊया.

DGKQK8

● **खालील वाक्ये वाचा.**

(अ) आईने आज काय स्वयंपाक केला आहे?
(आ) आजीने नीताला कोणता सल्ला दिला?

वाक्यात जेव्हा प्रश्न विचारलेला असतो, तेव्हा वाक्याच्या शेवटी '?' असे चिन्ह देतात. या चिन्हाला **प्रश्नचिन्ह** म्हणतात.

**शिक्षकांसाठी :** विद्यार्थ्यांना परिसरातील विविध सूचनाफलकांचे वाचन करण्यास सांगावे.

# ६. मधमाशी



● **ऐका. वाचा. म्हणा.**

उठुनि सकाळी ती मधमाशी ।
जाते की मध मिळवायासी ।
थेंबे थेंबे साठवि त्यासी ।
उद्योगी मोठी ।।१।।

आळस तिजला ठाउक नाही ।
सर्व दिवस ती खपते पाही ।
थंडी, ऊन म्हणेना काही ।
उद्योगी मोठी ।।२।।

गोड गोड मध निपटुनि घेते ।
थोडा म्हणुनी मुळी न रुसते ।
साठवुनी तो जपुनि ठेविते ।
उद्योगी मोठी ।।३।।


थोडाही गुण मिळता घ्यावा ।
साठा त्याचा नित्य करावा ।
कोणालाही तो शिकवावा ।
ठेवा हे चित्ती ।।४।।



मधमाशी सकाळी उठल्यापासून कामात मग्न असते. थंडी, ऊन यांची पर्वा न करता थेंब थेंब मध गोळा करून साठवते. मधमाशीचा 'उद्योगप्रियता' हा गुण आपण घ्यावा, तसेच ज्याच्याकडून जो गुण घेता येईल, त्या गुणांचा आपण अंगीकार करावा, असा संदेश प्रस्तुत कवितेतून दिला आहे.

**शब्दार्थ : तिजला** – तिला. **खपते** – कष्ट करते. **निपटुनि घेणे** – पूर्णपणे काढून घेणे. **साठा** – संग्रह.

## स्वाध्याय



**प्र. १. खालील प्रश्नांची एक–दोन वाक्यांत उत्तरे लिहा.**

(अ) सकाळी उठल्यावर मधमाशी काय करते?

(आ) मधमाशीला आळस ठाऊक नाही, असे का म्हटले आहे?

(इ) मधमाशी मधाची साठवण कोणत्या प्रकारे करते?

(ई) मधमाशीपासून आपण कोणता बोध घ्यायला पाहिजे?

**प्र. २. खाली दिलेल्या वाक्याशी संबंधित मुद्दे पाठाच्या आधारे लिहा.**

मधमाशीची काम करण्याची पद्धत

↓ ↓ ↓ ↓

**प्र. ३. कुटुंबातील मोठ्या व्यक्तींकडून मधाच्या उपयोगांविषयी अधिक माहिती मिळवा.**

**प्र. ४. निसर्गातील खालील घटकांकडून तुम्ही कोणता गुण घ्याल, ते लिहा.**

(१) नदी (२) मुंगी (३) सूर्य (४) चंद्र (५) पर्वत (६) वृक्ष

## खेळूया शब्दांशी.

**(अ) खालील यादीतून दिलेल्या शब्दांचे विरुद्धार्थी शब्द लिहा.**

निरुद्योगी, अवगुण, आळशी, दुर्गुण

(अ) उद्योगी (आ) गुण

**(आ) खालील शब्दांत काही अंक लपले आहेत ते शोधा. लिहा.**

उदा., साठवणे–साठ.

विचार, एकर, सातपुते, चाळीसगाव, नितीन, आठवडा, सहाण, पाचपुते, नऊवारी.

**(इ) खालील शब्दांपासून अर्थपूर्ण शब्द बनवा.**

उदा., मामशीध – मधमाशी

(१) सावणठ (२) ऊठाक (३) सळीका

**प्रकल्प :**

मधमाशी, मुंगी, फुलपाखरू या कीटकांची चित्रे मिळवा. त्यांचा संग्रह करा.

## सुविचार

- **जीवन फुलासारखे असू द्या; पण ध्येय मधमाशीप्रमाणे ठेवा.**
- **यशासाठी कष्ट करत राहणे, हाच एकमेव श्रेष्ठ मार्ग आहे.**

## हे करून पाहूया.



नारळाची एक मोठी रिकामी करवंटी घ्या. तिला स्वच्छ करा. करवंटीच्या आतील बाजूस तुम्हांला आवडेल तो रंग द्या. रंग सुकू द्या. सुतळीचे किंवा रिबिनीचे समान लांबीचे तीन तुकडे घ्या. त्या तीन तुकड्यांची आपण केसांची वेणी घालतो तशी घट्ट वेणी घाला. अशा अनेक वेण्या बनवा. तुम्ही रंगीबेरंगी वेण्या बनवल्या तरी चालतील. करवंटीला बाहेरून फेविकोल लावा. त्याच्यावर त्या वेण्या गोलाकार चिकटवा. दोन्ही हातांनी चिकटवलेल्या वेण्यांवर दाब द्या म्हणजे त्या वेण्या करवंटीवर घट्ट बसतील.

तुम्ही बनवलेल्या सुतळीच्या किंवा रिबिनीच्या तीन वेण्या अशा निवडा, ज्या खूप लांबसडक आहेत. त्यांतील एक-एक वेणी घेऊन ती करवंटीला तळापासून वरपर्यंत एका सरळ रेषेत चिकटवा. अशा तीनही वेण्या तीन बाजूंनी चिकटवा आणि चिकटवून शिल्लक राहिलेला वेण्यांचा भाग एकत्र करा. तिन्ही वेण्यांची टोके एकत्र बांधून अडकवण्यासाठी गोलाकार हूक तयार करा. मणी, टिकल्या, काचा, कागदाचे रंगीत वेगवेगळ्या आकारांचे तुकडे अशा वस्तूंनी करवंटीच्या पृष्ठभागाची सजावट करा. तयार झालेली वस्तू घरात कुठेही टांगा. झाले आपले हँगिंग होल्डर तयार! त्यात तुम्ही तुमच्या आवडीच्या छोट्या छोट्या वस्तू ठेवू शकता.

## आपण समजून घेऊया.

- **खालील परिच्छेद वाचा.**




शाळा सुटताच मुले शाळेबाहेर आली. शाळेच्या फाटकासमोर काही मुलांचे पालक उभे होते. रस्त्यावर वाहनांची गर्दी होती. मुलांसाठी वाहने थांबली. मुलांनी रस्ता ओलांडला.

वरील अधोरेखित शब्द स्वतंत्र नाहीत. बाहेर, समोर, वर, साठी हे शब्द अनुक्रमे शाळा, फाटक, रस्ता, मुले या शब्दांना जोडून आले आहेत, म्हणून ही **शब्दयोगी अव्यये** आहेत. आता, पूर्वी, नंतर, पर्यंत, आत, मागे, शिवाय हीदेखील शब्दयोगी अव्यये आहेत.

जेव्हा शब्दयोगी अव्यये नाम किंवा सर्वनाम यांना जोडून येतात, तेव्हा नामाच्या किंवा सर्वनामाच्या मूळ रूपात बदल होतो. अशा शब्दांना सामान्यरूप म्हणतात. उदा., शाळा-शाळेत, फाटक-फाटकात, रस्ता-रस्त्याला, मुले-मुलांना.

**लक्षात ठेवा :** शब्दयोगी अव्यय व क्रियाविशेषण अव्यय यांत फरक आहे.

**शिक्षकांसाठी :** विद्यार्थ्यांना शब्दयोगी अव्ययांची विविध उदाहरणे देऊन अधिक सराव करून घ्यावा. तसेच वेगवेगळ्या टाकाऊ वस्तूंपासून विविध कल्पक वस्तू तयार करून घ्याव्या. त्याबाबतचे अनुभव विद्यार्थ्यांकडून वर्गात सादर करुन घ्यावे.



**दिनांक :** १५.१२.२०२१

**प्रिय ताई,**

सप्रेम नमस्कार.

तुझं पत्र मिळालं; पण मला पत्र पाठवायला उशीर झाला. क्षमस्व! अगं ताई, तुला मी सांगितलं होतं ना, आमची सहल जाणार आहे म्हणून. मागच्या आठवड्यात मी सहलीला जाऊन आलो. कुठे माहितेय? पुण्याला.


खूप धमाल आली सहलीत. 'पुणे तेथे काय उणे' म्हणतात, ते खोटं नाही. पुण्यात एवढी प्रेक्षणीय स्थळं आहेत, की आम्हांला दोन दिवस पुरे पडले नाहीत. थांब, तुला सविस्तर सांगतो. अगं, आम्ही सकाळी दहा वाजता पुण्यात पोहोचलो. लगेचच नाश्ता करून आम्ही 'पुणेदर्शन'साठी निघालो. लालमहाल, शनिवारवाडा पाहिला. लालमहालातून फिरताना छत्रपती शिवाजी महाराजांच्या पराक्रमाच्या, शौर्याच्या कथा आमच्या बाईंनी सांगितल्या. त्या ऐकत तिथे फिरताना आम्ही इतिहासात जगतो आहोत, असं वाटत होतं. शनिवारवाडा पाहून डोळे तृप्त झाले. केवढा भव्य आहे तो शनिवारवाडा! त्यानंतर आम्ही केळकर वस्तुसंग्रहालय, पर्वती, सारसबाग, महादजी शिंदे यांची छत्री ह्या स्थळांना भेटी दिल्या. पर्वतीवरून पुण्याचा खूप मोठा परिसर नजरेच्या एका टप्प्यात दिसतो. ही ठिकाणं बघता बघता संध्याकाळ केव्हा झाली ते समजलंच नाही, नंतर आम्ही मुक्कामाच्या ठिकाणी गेलो.

दुसऱ्या दिवशी सकाळी आम्ही सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात गेलो. विद्यापीठाचा केवढा भव्य परिसर आहे! आमचे तर पाय दुखायला लागले चालून चालून. तिथली 'आयुका' ही संस्थाही पाहिली. त्यानंतर आम्ही सिंहगडावर गेलो. त्याची भव्यता, तिथली शांतता, निसर्गसौंदर्य आणि या गडाशी जोडलेली तानाजी मालुसरे यांची शौर्यकथा. ही सगळी ठिकाणं पाहून आम्ही भारावून गेलो.

मी पुण्याहून परतल्यावर ठरवलंय, की आपला सगळा इतिहास वाचायचा आणि समजून घ्यायचा. हा माझा नवीन वर्षाचा संकल्प आहे. हे सगळं पाहताना मला तुझी खूप आठवण आली.

तीर्थरुप बाबा व आईला साष्टांग नमस्कार. मी इथे मजेत आहे. माझा अभ्यासही व्यवस्थित चालला आहे. मी तुझ्या पत्राची वाट पाहतो आहे.

तुझा भाऊ,
मयूर.



**प्र. १. खालील प्रश्नांची एक-दोन वाक्यांत उत्तरे लिहा.**

(अ) मयूरने पत्रात ताईला सिंहगडाची कोणती वैशिष्ट्ये सांगितली आहेत?

(आ) मयूरने नवीन वर्षाचा कोणता संकल्प केला आहे?

**प्र. २. तुम्ही या वर्षात कोणता संकल्प केला आहे? तो संकल्प करण्यामागील कारणे लिहा.**



## विचार करा. सांगा.

माहिती घेण्यासाठी किंवा देण्यासाठी अनेक साधने वापरली जातात. माहितीची देवाणघेवाण करण्याची/संवादाची काही साधने खाली दिली आहेत. त्यांतील काही साधने एकतर्फी व काही साधने दुतर्फी माहितीची देवाणघेवाण करतात. त्यांची माहिती मिळवा. एकतर्फी माहितीची देवाणघेवाण करणाऱ्या साधनांपुढे ⟶ अशी खूण करा, तर दुतर्फी माहितीची देवाणघेवाण करणाऱ्या साधनांपुढे ⟷ अशी खूण करा.

उदा., चिठ्ठी ⟶ फोन ⟷

| | | | |
|---|---|---|---|
| (१) फॅक्स | (४) मोबाईल | (७) वर्तमानपत्र | (१०) मुलाखत |
| (२) पत्र | (५) आंतरजाल | (८) मोबाईल संदेश | (११) जाहिरात |
| (३) ई-मेल | (६) रेडिओ | (९) चर्चा | (१२) भाषण |

## माहिती मिळवूया.




- **आंतरजालावरून महाराष्ट्रातील थंड हवेची ठिकाणे, ऐतिहासिक ठिकाणे, प्रेक्षणीय ठिकाणे यांविषयीची माहिती मिळवा.**

## शब्दकोडे सोडवूया.

- **खालील चौकोनातील अक्षरांमध्ये शब्दयोगी अव्यये लपलेली आहेत. उभ्या, आडव्या, तिरप्या पद्धतीने अक्षरे घेऊन शब्दयोगी अव्यये बनवा व दिलेल्या जागेत लिहा.**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ती | नं | स | क | ट |
| व | ल | त | सा | ठी |
| र | स | मो | र | पु |
| न | ह | प्र | खा | ढे |
| जि | त | मा | गे | ली |
| क | प | णे | क | ड |

## ● वाचा. समजून घ्या.



**जॉर्डन :** अरे, उद्या सर्वांनी माझ्यासाठी थोडा वेळ काढा. मी तुम्हांला पाणीपुरी, ओली भेळ, रगडापुरी, पॅटिस खायला घेऊन जाणार आहे.

**नफिसा :** का रे, उद्या काही विशेष?

**अंजली :** अगं, उद्या त्याचा वाढदिवस आहे.

**अन्वर :** असं काय करताय? बाईंनी परवा सांगितलेलं आठवत नाही का? असं बाहेरचं, उघड्यावरचं अन्न खायचं नाही.

**अंजली :** हो, हो, त्यामुळे आरोग्याच्या तक्रारी सुरू होतात.

**नफिसा :** पोटदुखी होते. छातीत जळजळ होते. आपल्या शरीराला जीवनसत्त्वं, क्षार व इतर आवश्यक घटक मिळत नाहीत. त्यांच्या कमतरतेनं अनेक छोट्या-मोठ्या रोगांना आमंत्रण दिल्यासारखं होतं. नकोच ते असलं बाहेरचं खाणं!

**निखिल :** त्यापेक्षा आपण असं करू. प्रत्येकानं जॉर्डनच्या आवडीचा एक पदार्थ घरून बनवून आणायचा अन् सगळ्यांनी मिळून वाढदिवस साजरा करायचा.

**जॉर्डन :** ठीक आहे. माझी आई खूप छान केक बनवते. मी तुमच्यासाठी उद्या केक घेऊन येतो.

**अंजली :** जॉर्डन आम्ही तुझ्यासाठी काय आणणार हे तुला उद्याच कळेल!

● **खालील विधाने चूक (×) की बरोबर (✓) ते रिकाम्या चौकटींत लिहा.**

(अ) जंकफूड खाणे अयोग्य असते. ☐

(आ) आपल्या शरीराला पोषक घटकांची गरज नसते. ☐

(इ) पोषक घटकांच्या कमतरतेमुळे रोगांना आमंत्रण मिळते. ☐

(ई) बाहेरचे, उघड्यावरचे पदार्थ व जंकफूड खाण्याने आरोग्याच्या तक्रारी सुरू होतात. ☐

DH4HNI



### चर्चा करा. सांगा.

- रोजच्या जेवणात तुम्ही कोणते पदार्थ खाता?
- दररोज मसालेदार पदार्थ खाल्ल्याने काय होईल?
- मोड आलेली कडधान्ये का खावीत?
- ऋतुमानानुसार येणारी फळे का खावीत?
- बाहेरचे, उघड्यावरचे पदार्थ खाऊ नये, असे आई आपल्याला का सांगते?

**शिक्षकांसाठी :** विद्यार्थ्यांना विविध विषय देऊन त्यांवर संवादलेखन करायला सांगावे. त्यांचे वर्गात सादरीकरण करून घ्यावे. वरील प्रसंगाचे विद्यार्थ्यांकडून साभिनय सादरीकरण करून घ्यावे.

# ८. बक्षीस

**स्मिता सराफ** (जन्म-१९७०)ः विविध मासिके, वृत्तपत्रे यांमधून लेखन. आकाशवाणीवरील कार्यक्रमांच्या लेखनात सहभाग.

आजच्या दैनंदिन व्यवहारात प्लॅस्टिकचा अतिवापर होताना दिसतो. प्लॅस्टिकच्या पिशव्यांचा वापर बंद करून कापडी पिशव्या वापराव्या, हा संदेश प्रस्तुत पाठातून दिला आहे.

आई ऑफिसमधून येण्यापूर्वीच ठरल्याप्रमाणे चैतन्य क्रिकेट खेळून घरी आला. आई आल्यावर ती शिंकत असलेली पाहून त्याने आले टाकून मस्त चहा केला. चहाचा तो गरमागरम कप ओठाला लावल्यावर आईचा थकवा दूर झाला.



**आई :** काय रे, आज मजा आली का खेळताना?

**चैतन्य :** खूप मजा आली; पण आई, आज एक प्रकल्प दिलाय बाईंनी.

**आई :** अरे बापरे! तुझा प्रकल्प म्हणजे पोटात गोळा येतो माझ्या. त्यातून तुझे बाबाही घरी नाहीत. आम्ही दोघं हातभार लावतो, तेव्हा कुठे पूर्ण होतो तुझा प्रकल्प. आज काय सांगितलंय नवं?

**चैतन्य :** आई, काही विशेष नाही. बरं, मला सांग बाजारातून काहीही आणायचं असलं, की तू ते कशात आणतेस?

**आई :** कशात आणणार? प्लॅस्टिकच्या पिशवीत

**चैतन्य :** पण सामान आणल्यानंतर त्या पिशव्यांचं काय करतेस?

**आई :** काय करणार? कचऱ्याच्या डब्यात टाकते. ते काय मोठं धन आहे सांभाळून ठेवायला?

**चैतन्य :** बरं, आता नीट ऐक. उद्या एक तारीख. बाईंनी सांगितलंय तसं करूया. महिन्याभरात आपण कुठल्याही कारणानं येणाऱ्या सगळ्या प्लॅस्टिकच्या पिशव्या जपून ठेवू. महिन्याच्या शेवटी मोजून तो आकडा बाईंना सांगायचाय.

**आई :** चालेल.

मग रोज दूध, भाजी, किराणामालाबरोबर येणाऱ्या पिशव्या आई जमा करू लागली. असाच एक महिना पूर्ण झाला.

**चैतन्य :** आई, चल आपण त्या पिशव्या मोजू.

दोघांनी मिळून पिशव्या मोजल्या. त्या १०४ भरल्या.

**चैतन्य :** बापरे, १०४ पिशव्या! आपण चौघं म्हणजे दरडोई २६ पिशव्या! दर महिन्याला आपण एवढ्या पिशव्या कचऱ्यात टाकतो.

**आई :** बरं, झाला ना आता तुझा प्रकल्प?

**चैतन्य :** (हसून) अगं आई, आता तर खरा प्रकल्प सुरू झाला आहे. दर महिन्याला किती प्लॅस्टिकच्या पिशव्या वापरल्या याची नोंद करायची आणि त्यांचा वापर कमीकमी करत न्यायचा. तो कमी करण्याचे मार्ग, तसेच पिशव्यांच्या अतिवापराचे दुष्परिणाम या सगळ्यांचा अभ्यास मला या प्रकल्पाच्या

**शिक्षकांसाठी :** विद्यार्थ्यांकडून योग्य गतीने समजपूर्वक पाठाचे प्रकट वाचन करून घ्यावे. या संवादपाठाचे विद्यार्थ्यांकडून सादरीकरण करून घ्यावे. पाठातील एखाद्या परिच्छेदाचे अनुलेखन तसेच श्रुतलेखन करून घ्यावे.

निमित्तानं करायचाय. आपण आजपासून कमीत कमी प्लॅस्टिकच्या पिशव्यांचा वापर करू.

**आई :** अरे बाबा कसं शक्य आहे ते ?

**चैतन्य :** का शक्य नाही होणार? पूर्वी प्लॅस्टिकच्या पिशव्या नसतानाही लोक जगतच होते ना! आता मला सांग आई, आपण प्लॅस्टिकच्या पिशव्यांत काय काय आणतो ?

**आई :** हा काय प्रश्न झाला? दूध, तेल, भाजी, फळं, फुलं वगैरे आणतो.

**चैतन्य :** आई, तुझ्या लहानपणी होत्या का गं अशा पिशव्या ? तुम्ही कशात बाजारहाट करायचा ?

**आई :** सगळं बदललं बघ. माझी आई काटकसरी सुगृहिणी. माझ्या बाबांच्या जुन्या पँटच्या कापडाच्या पिशव्या शिवायची. ते बाहेर निघाले, की सोबत एखादी पिशवी असायचीच.

**चैतन्य :** ते भाजीपाला वगैरेसाठी ठीक आहे; पण मग दूध, तेल कसं आणायचा ?

**आई :** आतासारखं तेव्हा पॅक पिशव्यांत दूध, तेल मिळायचं नाही. दुधाची, तेलाची अशा वेगवेगळ्या बरण्या असायच्या.

**चैतन्य :** मग ठरलं तर आई. आजपासून आपण चौघांनी प्लॅस्टिकच्या पिशव्यांचा वापर कमीत कमी करायचा. हे साध्य करणाऱ्या मुलाला बाई छानसं बक्षीस देणार आहेत.

**आई :** मी करीन रे तुला मदत; पण तुझी आजी आणि बाबा यांनीही यात मदत करायला हवी.

तेव्हापासून आई, बाबा दोघेही दुचाकीच्या डिकीमध्ये कापडी पिशवी ठेवू लागले. किराणा आणताना पिशवीऐवजी कागदी पुड्यांचा आग्रह धरू लागले. एका रविवारी चवबदल म्हणून हॉटेलमधून जेवणाचे पार्सल आणण्यासाठी बाबा चक्क तीनखणी डबा सोबत घेऊन गेले. अशाप्रकारे 'प्लॅस्टिकची पिशवी हटाव' मोहीम जोरात सुरू होती.

प्लॅस्टिकचे विघटन होत नसल्यामुळे ते निसर्गात शेकडो वर्षे तसेच राहते. ते जमिनीचा कस घालवते, प्राण्यांच्या पोटात जाऊन त्यांचा जीव घेते, जलचरांनाही धोका पोहोचवते. बरे जाळू म्हटले, तर वायुप्रदूषण करते. हे सगळे बाईंनी व्हिडिओ क्लिपद्वारे पटवून दिले होते.


महिनाभर प्लॅस्टिकचा वापर टाळण्याचा एककलमी कार्यक्रम घरातल्या साऱ्यांनीच एखाद्या व्रतासारखा पाळला. महिना अखेरीस पिशव्या मोजायला चैतन्यला जराही वेळ लागला नाही, कारण फक्त चार पिशव्या होत्या. मनातल्या मनात त्याने स्वत:ची पाठ थोपटली.

महिनाअखेरीस वर्गात बाईंनी मुलांना प्रकल्पाविषयी विचारले. चैतन्यच्या परिवाराने प्लॅस्टिकचा वापर खूपच कमी केल्याबद्दल त्यांनी चैतन्यचे कौतुक केले.

**बाई :** खरं तर आजच्या प्रसंगी मी एखादी ट्रॉफीच देणार होते; पण चैतन्यला मी आज एक रोप देणार आहे. ते त्यानं वाढवावं, त्याची निगा राखावी. काय चैतन्य, हे आव्हान स्वीकारणार ना ?

चैतन्यने हसून मान डोलावली. एखादे गोजिरवाणे बाळ काळजीपूर्वक घ्यावे तसे ते रोप त्याने स्वीकारले. प्रत्येकाने एक तरी झाड लावून ते जगवणे का गरजेचे आहे, पर्यावरणपूरक जीवनशैली कशी असावी, याविषयी बाई पोटतिडकीने बोलत होत्या. समोरच्या बालमनांवर ते कोरले जात होते. विज्ञानयुगातले खरे नागरिक वर्गात आकार घेत होते.

**शब्दार्थ : पोटात गोळा येणे** – भीती वाटणे. **दरडोई** – प्रत्येकी. **तीनखणी डबा** – एकावर एक तीन डबे असलेला डबा. **परिवार** – कुटुंब. **पोटतिडकीने बोलणे** – अगदी मनापासून बोलणे.



## स्वाध्याय

**प्र. १. खालील प्रश्नांची एक-दोन वाक्यांत उत्तरे लिहा.**

(अ) प्रकल्पाच्या निमित्ताने चैतन्य कशाचा अभ्यास करणार होता?

(आ) आपण प्लॅस्टिकच्या पिशव्यांमधून काय काय आणतो, असे आईने चैतन्यला सांगितले?

(इ) चैतन्याच्या आईने तिच्या आईला 'काटकसरी सुगृहिणी' का म्हटले आहे?

(ई) प्रकल्प पूर्ण झाल्यावर बाईंनी मुलांना कोणता उपदेश केला?

**प्र. २. पाठाच्या आधारे खालील वाक्ये योग्य घटनाक्रमाने लिहा.**

(अ) महिना अखेरीला चैतन्यने पिशव्या मोजल्या.

(आ) चैतन्यने आईला प्रकल्पाबद्दल सांगितले.

(इ) बाईंनी वर्गात चैतन्यचे कौतुक केले.

(ई) चैतन्य क्रिकेट खेळून घरी आला.

**प्र. ३. खालील आकृती पूर्ण करा.**

बाईंने मुलांना व्हिडिओ क्लिपद्वारे पटवून दिलेल्या गोष्टी

| | | | |
|---|---|---|---|
| | | | |



**चर्चा करा. सांगा.**

- प्लॅस्टिकच्या पिशव्यांचा वापर बंद केल्याने कोणकोणते फायदे होतील याची चर्चा करा व लिहा.
- शाळा-शाळांमधून 'प्लॅस्टिक कचरामुक्त अभियान' हा उपक्रम राबवला गेला. प्लॅस्टिकचा कचरा गोळा करताना तुम्ही कोणकोणत्या वस्तू उचलल्या ते सांगा.

## खेळूया शब्दांशी.

**(अ) खालील शब्दांचे वचन बदला.**

(१) पिशवी - (३) महिना - (५) गोष्ट -

(२) डबा - (४) चहा - (६) बरणी-

**(आ) खालील पयार्यांमधून योग्य अर्थाचा पर्याय शोधा.**

(अ) पोटात गोळा येणे -

(१) पोटात दुखणे. (२) पोट फुगणे. (३) भीती वाटणे.

(आ) हातभार लावणे -

(१) भार उचलणे. (२) मदत करणे. (३) हात लावणे.

(इ) पाठ थोपटणे –

(१) कौतुक करणे. (२) पाठीवर मारणे. (३) पाठीमागे बोलणे.

**(इ) खालील वाक्यांतील नामे ओळखा.**

(अ) आपण प्लॅस्टिकच्या पिशव्या कचऱ्याच्या डब्यात टाकतो.

(आ) चार पिशव्या होत्या.

(इ) विज्ञानयुगातले खरे नागरिक वर्गात आकार घेत होते.

**(ई) खालील शब्दांत लपलेले शब्द शोधा.**

(१) गरमागरम (२) हातभार (३) बाजारहाट (४) दुकानदार

**(उ) खालील आकृतीत 'करी' हा प्रत्यय लावून तयार झालेले शब्द दिले आहेत. हे शब्द अभ्यासा. 'वान' हा प्रत्यय लावून तयार होणारे शब्द पुढील रिकाम्या आकृतीसमोर लिहा.**

**करी** → भाडेकरी, देणेकरी, शेतकरी, पहारेकरी, वारकरी

**वान** → 

**खेळ खेळूया.**

- **खाली दिलेल्या चौकटींत म्हणी लपलेल्या आहेत, त्या ओळखा व लिहा.**

| | | | |
|---|---|---|---|
| ग | र | खा | ☒ |
| घ | र्वा | चे | ली |

| | | | |
|---|---|---|---|
| आ | ☒ | बा | य |
| ना | गो | त्या | बि |
| त | ☒ | ळा | ☒ |

| | | | |
|---|---|---|---|
| खा | मा | त | ☒ |
| ती | ण | ☒ | शी |

**उपक्रम :**

प्लॅस्टिकच्या पिशव्यांच्या वापराची कारणे शोधा. प्लॅस्टिकऐवजी कोणकोणत्या वस्तू/साधनांचा आपण वापर करू शकतो त्याची यादी करा.

- **खालील रिकाम्या पाट्यांवर प्लॅस्टिकचा वापर टाळण्यासंदर्भातील घोषवाक्ये तयार करून लिहा.**

**शिक्षकांसाठी :** विद्यार्थ्यांकडून वेगवेगळ्या विषयांवर आधारित घोषवाक्ये व सुविचार सुवाच्य अक्षरांत लिहून घ्यावे. वर्गात किंवा शाळेच्या परिसरात लावावे.

## आपण समजून घेऊया.

- **खालील वाक्ये वाचा.**

(अ) रमेश आणि आई बाजारात पोहोचले अन् पावसाची रिपरिप सुरू झाली.

(आ) मला पाऊस खूप आवडतो, कारण मला पावसात भिजायला आवडते.

(इ) आम्ही खूप सराव केला, म्हणून आम्ही जिंकलो.

(ई) आजी रिक्षा किंवा बसने प्रवास करते.

वरील वाक्यांतील अधोरेखित शब्द **उभयान्वयी अव्यये** आहेत. उभयान्वयी अव्यये दोन किंवा अधिक शब्दांना तसेच दोन किंवा अधिक वाक्यांना जोडण्याचे काम करतात. शिवाय, की, परंतु, म्हणजे, तरी, नि, अन् हे सर्व शब्द दोन शब्दांना किंवा दोन वाक्यांना जोडण्याचे काम करतात, म्हणून हे शब्द **उभयान्वयी अव्यये** आहेत.

**लक्षात ठेवा :** उभय म्हणजे दोन व अन्वय या शब्दाचा अर्थ संबंध असा आहे. वाक्यातील दोन शब्द किंवा दोन वाक्ये यांचा संबंध जोडणे हे उभयान्वयी अव्ययाचे कार्य आहे.

- **खालील संवादातील उभयान्वयी अव्यये अधोरेखित करा.**

**आई** : आपल्याकडे पाहुणे येणार आहेत, म्हणून आपण पुरणपोळी करूया.

**मंदार** : आई, तू बटाट्याची भाजी अन् पुऱ्या कर म्हणजे मी तुला मदत करू शकेन, शिवाय स्वयंपाकही लवकर होईल. जर पाहुणे लवकर आले, तर त्यांना वेळेवर जेवायला मिळेल; पण पाहुण्यांना आवडेल ना आपण केलेला स्वयंपाक?

- **खालील वाक्ये वाचा.**

(अ) नीताला 'हापूस आंबा' आवडतो.

(आ) रेहानाने प्रतिभाला सांगितले, की 'मेरीच्या गटाला एक प्रकल्प दिला आहे.'

एखाद्या शब्दावर जोर द्यायचा असेल किंवा दुसऱ्याचे मत अप्रत्यक्ष सांगायचे असेल तेव्हा '.........' असे **एकेरी अवतरणचिन्ह** वापरले जाते.

DHD006

- **खालील वाक्ये वाचा.**

(अ) दादा आईला म्हणाला, "उद्या मी लवकर उठून मैदानावर जाणार आहे."

(आ) रेश्मा विनिताला म्हणाली, "उद्या आपण फिरायला जाऊ."

बोलणाऱ्याच्या तोंडचे शब्द दाखवण्यासाठी ".........." असे **दुहेरी अवतरणचिन्ह** वापरले जाते.

## सुविचार

- **सेवेचा एक हात प्रार्थनेसाठी जोडलेल्या दोन हातांपेक्षा अधिक उपयुक्त असतो.**
- **मनुष्याच्या मनाची ओढ व तळमळ निम्मे काम करते, उरलेले निम्मे काम अभ्यासाने होते.**

**शिक्षकांसाठी :** विद्यार्थ्यांना उभयान्वयी अव्ययांची विविध उदाहरणे देऊन अधिक सराव करून घ्यावा.

# ९. सदैव सैनिका, पुढेच जायचे

• ऐका. वाचा. म्हणा.



सदैव सैनिका पुढेच जायचे
न मागुती तुवा कधी फिरायचे

सदा तुझ्यापुढे उभी असे निशा
सदैव काजळी दिसायच्या दिशा
मधून मेघ हे नभास ग्रासती
मधेच या विजा भयाण हासती
दहा दिशांतुनी तुफान व्हायचे
सदैव सैनिका पुढेच जायचे

प्रलोभने तुला न लोभ दाविती
न मोहबंधने पदांस बांधिती
विरोध क्रोध वा तुला न थांबवी
न मोह भासतो गजान्त वैभवी
न दैन्यही तुझे कधी सरायचे
सदैव सैनिका पुढेच जायचे




**वसंत बापट** (१९२२-२००२) : प्रसिद्ध कवी. 'अकरावी दिशा', 'सकीना', 'प्रवासाच्या कविता', 'शिंग फुंकिले रणी', 'मानसी', 'शूर मर्दाचा पोवाडा', 'मेघहृदय', 'तेजसी', 'राजसी', 'रसिया' हे काव्यसंग्रह; 'चंगामंगा', 'अबडकतबडक', 'आम्ही', 'बालगोविंद' हे बालवाङ्मय; 'बारा गावचं पाणी' हे प्रवासवर्णन प्रसिद्ध. 'शिंग फुंकिले रणी' या पुस्तकातून ही कविता घेतलेली आहे.

प्रस्तुत कविता ही देशाच्या रक्षणासाठी अहोरात्र झगडणाऱ्या सैनिकांच्या समर्पित जीवनाचा परिचय करून देणारी आहे.

**शब्दार्थ :** **सदैव** – नेहमी. **मागुती** – मागे. **निशा**– रात्र. **ग्रासणे**– व्यापणे. **प्रलोभन**– आमिष. **मोहबंधन**– मोहात पडणे. **गजान्त वैभव**– अतिशय श्रीमंती. **दैन्य**– गरिबी.

## स्वाध्याय



**प्र. १. खालील प्रश्नांची एक–दोन वाक्यांत उत्तरे लिहा.**

(अ) सैनिक नेहमी मनाशी कोणते ध्येय बाळगतो ?

(आ) सैनिकापुढे कोणती संकटे उभी आहेत ?

(इ) सैनिकाला कोणत्या गोष्टी थांबवू शकत नाहीत ?

### खेळूया शब्दांशी.

**(अ) खालील शब्दांसाठी कवितेतील समानार्थी शब्द लिहा.**

(१) आकाश (२) रात्र (३) ढग (४) राग (५) लोभ

**(आ) गटात न बसणारा शब्द लिहा.**


(१) निशा, रजनी, यामिनी, मेघ (२) सदैव, नित्य, सदोदित, क्वचित

**(इ) अचूक शब्द ओळखा.**

(१) दीशा/दिशा/दीषा/दिषा

(२) सैदव/सदईव/सदैव/सदवै

**(ई) 'गैर' हा उपसर्ग लावून तयार झालेले शब्द खालील आकृतीत दिले आहेत. हे शब्द अभ्यासा. 'अ' हा उपसर्ग लावून तयार होणारे शब्द पुढील आकृतीमध्ये लिहा.**




### खेळ खेळूया.

• **पिवळ्या चौकोनात जोडशब्दातला पहिला शब्द व गुलाबी चौकोनात जोडशब्दातला दुसरा शब्द दिला आहे. त्यापासून योग्य जोडशब्द तयार करा. दिलेल्या जागेत लिहा.**

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| संध्याकाळ | | कौतुक | | | खाली |
| | कोड | वर | पांढरे | सकाळ | |
| फटक | डोंगर | जमवा | गप्पा | घाबरा | घुबरा |
| टप्पा | | जमव | | | दरी |

____________ ____________

____________ ____________

____________ ____________

____________ ____________



## लिहिते होऊया.

**(अ) तुम्ही कोण होणार, ते ठरवा. त्यासंबंधित काही प्रश्न खाली दिले आहेत. त्यांवर विचार करा. त्या प्रश्नांची उत्तरे तयार करून त्यांचे सलग लेखन करा.**

मी.......... होणार!

- मी हे व्हायचे का ठरवले आहे ?
- मी ठरवलेले होण्याबाबत माझ्या कुटुंबातील सदस्यांची काय मते आहेत ?
- हे होण्यासाठी मी काय प्रयत्न करणार आहे ?
- मी हे बनल्यानंतर भविष्यात काय काय करणार आहे ?

**(आ) खालील मुद्द्यांच्या आधारे अर्थपूर्ण परिच्छेद तयार करा व त्याला योग्य शीर्षक द्या.**

संध्याकाळची वेळ .......... आईबरोबर फिरायला.......... झाडांवर बसलेले पाखरांचे थवे.......... किलबिल..........गाई-गुरे घराकडे .......... आल्हाददायक वातावरण..........आईशी गप्पा मारत घराकडे परतणे.

## आपण समजून घेऊया.

- **खालील वाक्ये वाचा.**



शाब्बास ! चेंडूचा झेल छान घेतलास !



छे छे ! मला माहीत नाही !



बापरे ! तो पाहा साप !




अबब ! केवढी ही गर्दी !

आपल्या मनात दाटून आलेल्या भावना आपण एखाद्या उद्गारावाटे व्यक्त करतो. वरील वाक्यांतील शाब्बास, छे छे, बापरे, अबब ही **केवलप्रयोगी अव्यये** आहेत. या शब्दांमुळे आपल्या मनातील भावना प्रभावीपणे व्यक्त होतात. या शब्दांना उद्गारवाचक शब्द असेही म्हणतात.

**शिक्षकांसाठी :** विद्यार्थ्यांना केवलप्रयोगी अव्ययांची विविध उदाहरणे देऊन अधिक सराव करून घ्यावा. विद्यार्थ्यांना शब्द, चित्र, चित्र व शब्द या वेगवेगळ्या स्वरूपांत अपूर्ण गोष्ट द्यावी व ती पूर्ण करून घ्यावी .

## ● आम्ही बातमी वाचतो.

### *मराठी राजभाषा दिन उत्साहात साजरा*



वानवडी, ता. २८ : विद्यावर्धिनी विद्यालय, वानवडी येथे जागतिक मराठी राजभाषा दिन उत्साहात साजरा करण्यात आला. या दिवशी विद्यालयात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. ग्रंथदिंडीने कार्यक्रमाची सुरुवात झाली. कार्यक्रमप्रसंगी विद्यार्थ्यांनी कविता, गोष्टी, ओव्या सादर केल्या, तसेच ग्रंथप्रदर्शनाचेही आयोजन करण्यात आले. शाळेच्या परिसरात भित्तिपत्रके लावण्यात आली, त्यांतून विद्यार्थ्यांना मराठी भाषेच्या संवर्धनाचा संदेश देण्यात आला. या वेळी मुलांनी कवी कुसुमाग्रज यांच्या निवडक कवितांचे वाचन केले.

शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती विनया भांबुटे यांनी विद्यार्थ्यांसमोर मराठी भाषेचे महत्त्व विशद केले. इयत्ता सातवीतील कृष्णा साखरे या विद्यार्थ्याने सूत्रसंचालन केले, तर जयश्री रणदिवे या विद्यार्थिनीने उपस्थित सर्व मान्यवर व विद्यार्थी यांचे आभार मानले.

● **खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.**

(१) कार्यक्रमाची सुरुवात कशाने करण्यात आली?
(२) विद्यावर्धिनी विद्यालयात कोणकोणते कार्यक्रम साजरे करण्यात आले?
(३) मराठी राजभाषा दिन कोणत्या तारखेस साजरा केला जातो?
(४) कवी कुसुमाग्रज यांचे पूर्ण नाव काय?
(५) मराठी भाषेच्या संवर्धनासाठी काय करायला हवे, असे तुम्हांला वाटते?
(६) आंतरजालावरून कवी कुसुमाग्रज यांच्या कविता मिळवा व वाचा.

DHN9RT

### आपण समजून घेऊया.

● **खालील शब्द वाचा.**

पाऊल, गरीब, चूल, माणूस, जमीन, पाटील, कठीण, फूल, सामाईक, संगीत, शरीर.

वरील शब्दांतील शेवटच्या दोन अक्षरांचे निरीक्षण करा. काय जाणवते?

या शब्दांतील शेवटच्या अक्षराला काना, मात्रा, वेलांटी, उकार या चिन्हांपैकी कोणतेच चिन्ह नाही; म्हणजेच या शब्दांतील शेवटचे अक्षर अकारान्त आहे आणि शेवटून दुसऱ्या अक्षराला दिलेली वेलांटी किंवा उकार दीर्घ आहे.

**लक्षात ठेवा :** मराठी शब्दांतील अकारान्तापूर्वीचे इकार व उकार दीर्घ लिहितात; परंतु तत्सम (संस्कृतमधून मराठीमध्ये जसेच्या तसे आलेले शब्द) शब्दांतील अकारान्तापूर्वीचे इकार व उकार संस्कृतमधील मूळ शब्दाप्रमाणे ऱ्हस्व लिहितात. उदा., चतुर, मंदिर, गुण, कुसुम, प्रिय, अनिल, स्थानिक.

**शिक्षकांसाठी :** विद्यार्थ्यांना विविध प्रसारमाध्यमांद्वारे प्रसारित होणाऱ्या बातम्यांचे श्रवण/वाचन करण्यास सांगावे. विद्यार्थ्यांना एखादा विषय देऊन संबंधित बातम्यांचे संकलन करण्यास सांगावे. उदा., क्रीडा.

# १०. माणुसकी आणि मोठेपणा

**शंकर कवळे** (जन्म-१९७४): ‘आरती’, ‘अनुराग’, ‘बिजली’ या कादंबऱ्या; ‘माणुसकीचा मोठेपणा’, ‘बुद्धिमान बिरबल’, ‘खरा माणूस’ हे कथासंग्रह; ‘लोकशाहीर अण्णा भाऊ साठे’ हे चरित्र प्रसिद्ध. हा पाठ ‘माणुसकीचा मोठेपणा’ या कथासंग्रहातून घेतला आहे.

साधूमहाराजांनी धनाचा गर्व झालेल्या राजाला माणुसकीची जाणीव कशी करून दिली, याचे अतिशय सहज व सुंदर वर्णन लेखकाने प्रस्तुत पाठात केले आहे.

महाराज वीरभद्रसेन यांचा वाढदिवस होता. दरबारात सर्वजण हजर होते. महाराजांना भेट देण्यासाठी अनेकांनी विविध मौल्यवान वस्तू आणल्या होत्या. महाराज थाटात सिंहासनावर विराजमान झाले होते. सर्व उपस्थितांनी महाराजांना आदरपूर्वक शुभेच्छा दिल्या.

महाराजांना भेटवस्तू देण्याचा कार्यक्रम सुरू झाला. अनेकजणांनी महाराजांना भेट देण्यासाठी सुवर्ण अलंकार आणले होते. वास्तविक, राजाला सुवर्ण अलंकारांची कमी नव्हती, तरीही किमती दागिने भेट देऊन आपल्या मोठेपणाची मिजास बाळगणे, हाच या वेळी भेटवस्तू देणाऱ्यांचा मुख्य हेतू होता. अनेकांनी ताठ मानेने महाराजांना सुवर्णालंकार भेट देऊ केले. राजा त्या अलंकारांवर व ते देऊ करणाऱ्या प्रजाजनांवरही बेहद खूश झाला.

या वेळी गुलाबाचे छोटे फूल घेऊन आलेला वामन गंभीरपणे विचारमग्न होता, ‘मी गरीब, बागेमध्ये फुलझाडांची व्यवस्था राखणारा साधा माणूस. इतरांनी महाराजांना सुवर्ण अलंकार भेट दिलेत आणि मी फक्त गुलाबाचं फूल घेऊन आलोय. महाराज हे फूल गोड मानून घेतील का? गुलाबपुष्प हे सुवर्णालंकाराच्या किमती इतकं मौल्यवान निश्चितच नाही. राजाने या फुलाचा तिरस्कार केला तर दरबारात आपली फजिती होईल. लोक हसतील. काय करावं?’

वामन अस्वस्थ झाला होता; पण पाण्यात पाय टाकल्याशिवाय त्या पाण्याची खोली कळून येत नसते, म्हणून महाराजांना फूल द्यायचं, असा त्याने निश्चय केला. तो पुढे होऊन महाराजांना नम्रपणे म्हणाला, ‘‘महाराज! माझ्यातर्फे हे ‘गुलाबाचं फूल’ भेट म्हणून स्वीकारा. मौल्यवान दागिना मी आणू शकत नाही.’’ हात पुढे करून तो महाराजांना फूल देऊ लागला; पण महाराज फुलाचा स्वीकार न करता गप्पच बसले. आपल्यासारख्या बड्या राजाने मामुली गुलाबाचे फूल भेट म्हणून स्वीकारावे, हे राजाला योग्य वाटले नाही. काही क्षण दरबारात नि:शब्द शांतता पसरली. महाराज फूल घेईनात, हे लक्षात येताच दरबारातील उपस्थितांनी फिदीफिदी हसायला सुरुवात केली. वामनची फजिती झाली होती. त्याने मान खाली घातली. राजाही हसू लागला.


एक वृद्ध साधूमहाराज वाढदिवसानिमित्त दरबारात हजर होते. घडलेला प्रकार पाहून त्यांना राजाच्या वागण्याचे दु:ख झाले. राजासमोर येऊन ते गंभीरपणे म्हणाले, ‘‘राजन! या गरीब गृहस्थानं आणलेलं फूल इतकं मामुली आणि छोटं वाटलं, की तुलाही हसू फुटावं?’’

दरबारातील हशा थंडावला. राजा म्हणाला, ‘‘अर्थातच! कारण हे फूल छोटं तर आहेच, शिवाय मौल्यवानही नाही. आता हेच पाहा ना, माझ्या बोटातील अंगठी त्या फुलापेक्षा कितीतरी छोटी असली, तरी तिची किंमत मोठी आहे. तसं त्या फुलाची काय किंमत? किंमत मोठी नाही, निदान हे फूल तरी खूप मोठं असायला हवं होतं.’’

साधूमहाराज म्हणाले, ‘‘यापेक्षा तुला किती मोठं फूलं हवं राजन?’’

राजा म्हणाला, ‘‘त्या फुलाचं आकारमान रथाच्या चाकाएवढं असतं, तर माझ्यासारख्या राजाला ते भेट म्हणून स्वीकारताना शोभून दिसलं असतं.’’

वृद्ध साधूंनी स्मितहास्य केले. साधू म्हणाले, ''रथचक्राएवढं पुष्प माझ्यातरी पाहण्यात कधी आलं नाही राजन ! आणि ते असलं, तरी तेवढं मोठं फूल खरेदी करण्याची या गरीब गृहस्थाची ऐपत नाही. तेव्हा लक्ष देऊन ऐक. याच्यासारखा तू तर गरीब नाहीस. या राज्याचा सत्ताधीश आहेस. आता रथचक्राएवढं गुलाबाचं फूल तूच आणून दाखव व भिक्षा म्हणून मला दान कर. एवढं करण्याची तुझी ऐपत असेलच.''



सर्व दरबार चूप झाला; पण अभिमानी राजा डगमगला नाही. थोडा विचार करून तो बोलला, ''ठीक आहे स्वामीजी. मला उद्या सकाळपर्यंत मुदत द्या. मी उद्या तुम्हांला रथाच्या चाकाएवढं गुलाबपुष्प भिक्षादान करणारच !''

लागलीच राजाने या कामी एका कुशल कारागिराची निवड केली. रथचक्राएवढे गुलाबाचे फूल बनवणे सोपे नसले तरी अशक्य नव्हते. कारागीर काळजीपूर्वक काम करू लागला. आपले कलाकौशल्य पणाला लावून त्याने रंगीत लाल कागदांपासून मोठे गुलाबपुष्प तयार केले.

दुसऱ्या दिवशी पुन्हा दरबार भरला. सर्वांच्या उपस्थितीत ते कृत्रिम गुलाबपुष्प दरबारात आणले गेले. त्या कुशल कारागिराने फुलाची जडणघडण हुबेहूब केलेली होती. रथाच्या चाकाएवढे ते प्रचंड फूल पाहून उपस्थितांना त्याचे नावीन्य वाटत होते. अखेर आपण बाजी जिंकली. या आविर्भावात राजा म्हणाला, ''साधूमहाराज रथाच्या चाकाएवढं प्रचंड गुलाबपुष्प पाहून घ्यावं. हे फूल मी तुम्हाला भिक्षादान केलं, त्याचा स्वीकार करावा.''

साधूमहाराजांनी फुलाचं निरीक्षण केलं आणि प्रशंसाही करू लागले, ''वा ! वा ! उत्तम कलाकौशल्याचा हा एक नमुनाच आहे. धन्य तो कारागीर ज्याने ही कलाकृती साकारली. हिरवा देठ, लाल पाकळ्या, अगदी हुबेहूब आहेत फक्त एकच उणीव राहिलीय याच्यात, तेवढी तू भरून काढ राजन ! म्हणजे हे फूल मी आनंदाने स्वीकारेन.''

राजा क्षणभर चपापला. ''आता कसली उणीव स्वामीजी ?''

साधूमहाराज शांत हसून नम्रपणे बोलू लागले, ''राजन कलाकृती उत्कृष्ट आहे यात संशय नाही. या फुलाला रंग, रूप, आकार आहे; पण गंध नाही. या प्रचंड फुलामुळे एव्हाना हा दरबार गुलाबगंधाने दरवळून जायला हवा होता. सुगंधाशिवाय या प्रचंड फुलाची काय किंमत उरली ? हे फूल मोठं असूनही खोटं आहे हे ध्यानात ठेव. सुगंधाशिवाय फूल शोभत नाही, मग ते कितीही मोठं असो . माणूस कितीही मोठा असला, तरी माणुसकीशिवाय त्याच्या मोठेपणाला किंमत नसते. माणुसकीशिवाय मोठेपण म्हणजे सुगंधाशिवाय फूल ! काल दरबारात आलेला गृहस्थ गरीब होता; पण त्याच्याजवळ माणुसकी होती. त्या माणुसकीखातर तो गुलाबाचं फूल देण्यास दरबारात आला होता; पण तुझ्या वैभवापुढे तो तुला छोटा वाटला. तुझ्याजवळ माणुसकी नसल्यामुळे त्याच्यातली माणुसकी तुला दिसली नाही. इथून पुढे स्वत: माणुसकी बाळग आणि


माणसातील मोठेपण त्याच्या माणुसकीवरून ठरव.''

राजाला आपली चूक कळून आली. आपली चूक कबूल करून त्याने साधूमहाराजांची क्षमा मागितली व इथून पुढे माणुसकी बाळगून माणसातील मोठेपण बघण्याचे त्याने त्यांना वचन दिले.

अलंकारांचा लोभ धरण्यापेक्षा प्रजेचे हित साधावे. तहानलेल्याला पाणी द्यावे, भुकेला असेल त्यास अन्न द्यावे, बेघर असणाऱ्याला निवारा द्यावा, भूमिहीनास जमीन द्यावी आणि अज्ञानी असेल त्यास ज्ञानी बनवावे यातच खरी माणुसकी आहे, हे राजाला कळून चुकले होते.

**शब्दार्थ :** **बेहद** – खूप. **बाजी** – डाव. **चपापणे** – घाबरणे. **लोभ** – हाव.

## स्वाध्याय



**प्र. १. खालील प्रश्नांची एक-दोन वाक्यांत उत्तरे लिहा.**

(अ) उपस्थितांनी महाराजांना शुभेच्छा का दिल्या ?

(आ) महाराजांना भेटवस्तू देणाऱ्यांचा मुख्य हेतू काय होता ?

(इ) राजाने वामनचे फूल का स्वीकारले नाही ?

(ई) राजाने साधूमहाराजांना कोणते वचन दिले ?

(उ) राजाला जाणवलेला माणुसकीचा खरा अर्थ कोणता ?

**प्र. २. वामनने आणलेले फूल व राजाने बनवलेले फूल यांतील फरक तुमच्या शब्दांत सांगा.**

**प्र. ३. पाठातील महाराज व वामन यांची स्वभाववैशिष्ट्ये तुमच्या शब्दांत सांगा.**

**प्र. ४. तुम्हांला आवडलेली या पाठातील वाक्ये सुंदर अक्षरांत लिहा व वर्गात लावा.**

## खेळूया शब्दांशी.

**(अ) अचूक शब्द ओळखा.**

(अ) कुत्रिम, कृरतीम, कृत्रिम, कृत्रीम

(आ) गुलाबपूष्प, गुलाबपुष्प, गुलाबपुषप, गुलाबपुश्प

(इ) गृहस्त, गृहस्थ, गृहहस्त, ग्रृहस्त

**(आ) खालील शब्दांतील सहसंबंध लिहा.**

| 'अ' गट | 'ब' गट |
|---|---|
| वाढदिवस | पाणी |
| तहान | शुभेच्छा |
| अन्न | अलंकार |
| फूल | गुलाब |
| भेटवस्तू | भुकेला |

## खेळ खेळूया.

- **खालील वाक्यडोंगर वाचा. त्याप्रमाणे दिलेल्या शब्दाचा वाक्यडोंगर बनवा.**

| पक्षी |
|---|
| पक्षी उडतो. |
| पक्षी आकाशात उडतो. |
| पक्षी आकाशात उंच उडतो. |
| पक्षी निळ्या आकाशात उंच उडतो. |

| मित्र |
|---|
| |
| |
| |
| |

- **विरामचिन्हांचा योग्य वापर करून परिच्छेद सुवाच्य अक्षरांत पुन्हा लिहा.**

आई आज आमच्या शाळेत ई–कचरा याविषयी माहिती सांगण्यासाठी एक ताई व दादा आले होते ई–कचरा म्हणजे काय आईने विचारले ई–कचरा म्हणजे आपल्या घरातील जुन्या पुराण्या न चालणाऱ्या खराब झालेल्या आपण अडगळीत टाकून दिलेल्या विद्‌युत उपकरणांचा कचरा असा कितीसा ई–कचरा असतो प्रत्येकाच्या घरात आई म्हणाली अगं खूप ई–कचरा असतो प्रत्येकाच्या घरात बघ आता खराब झालेला फोन मोबाईल संगणक व त्याचे भाग फ्रिज टी. व्ही. मिक्सर इस्त्री ट्यूबलाइट बल्ब अरे बापरे खरंच की बरीच मोठी यादी होईल या ई–कचऱ्याची

- **वाचा. समजून घ्या.**

आपल्या मनात जितक्या प्रकारच्या भावना असतात, तितके केवलप्रयोगी अव्ययाचे प्रकार असतात. या विविध भावना व त्या भावना व्यक्त करणारे शब्द खालील तक्त्यात दिले आहेत.

| केवलप्रयोगी अव्यये | त्यातील शब्द |
|---|---|
| **हर्षदर्शक** | वा, वावा, आहा, ओहो, आ–हा, अहाहा. |
| **शोकदर्शक** | ऊं, अ‍ॅ:, अरेरे, अयाई, अगाई, हाय हाय, हाय. |
| **आश्चर्यकारक** | ऑ, ओहो, अबब, बापरे, अहाहा, चक्‌चक्, अरेच्या. |
| **प्रशंसादर्शक** | शाबास, भले, वाहवा, छान, ठीक, फक्कड, खाशी. |
| **संमतिदर्शक** | हां, जी, जीहां, ठीक, बराय, हाँ, अच्छा. |
| **विरोधीदर्शक** | छे, छट्, हॅट, ऊः, उंहू, च, अंहं, छे छे. |
| **तिरस्कारदर्शक** | धीक्, थुः, शीड, हुड्त, हुड, हत्, छी. |
| **संबोधनदर्शक** | अरे, अगे, अहो, ए, अगो, बा, रे, अगी. |
| **मौनदर्शक** | चुप, गप, गुपचूप, चिडीचूप. |

**शिक्षकांसाठी :** विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तकातील सर्व भाषिक खेळ खेळण्याची संधी द्यावी. असे विविध भाषिक खेळ स्वत: तयार करून विद्यार्थ्यांकडून अधिकाधिक सराव करून घ्यावा.

## ● आम्ही जाहिरात वाचतो.

**खुशखबर ! खुशखबर ! खुशखबर !**

**तमाम बालगोपाळांसाठी धमाल विनोदी बालनाट्य**

**पाहायला विसरू नका.**

**कालावधी :** ६ ते १० सप्टेंबर २०२१
**वेळ :** सायंकाळी ५ वाजता.
**स्थळ :** कलाविष्कार नाट्यमंदिर, सोलापूर.

*पोट धरून हसवायला लावणारे नाटक*

**हास्याचा धबधबा**

• लेखक • प्रशांत मेनकुदळे

• दिग्दर्शक • अशोक देशपांडे



प्रत्येक बालप्रेक्षकास विनोदी गोष्टींचे एक पुस्तक भेट.

**तिकीटविक्री :** उद्या दि. १ सप्टेंबरपासून कलाविष्कार नाट्यमंदिर येथे सकाळी ९.०० ते सायंकाळी ५.०० पर्यंत.

- **वरील जाहिरातीच्या आधारे खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.**

(१) ही जाहिरात कशाच्या संदर्भात आहे ?
(२) कोणत्या कालावधीमध्ये बालनाट्याचे प्रयोग होणार आहेत ?
(३) बालनाट्य कोठे होणार आहे ?
(४) प्रत्येक बालप्रेक्षकास भेट म्हणून काय मिळणार आहे ?
(५) शिक्षकांच्या मदतीने नाटकाचे विविध प्रकार माहीत करून घ्या.

DHH5TG

### आपण समजून घेऊया.

- **खालील शब्द वाचा.**

किडा, मेहुणा, पादुका, बाहुली, महिना, पहिली, सगुणा, तालुका, भिडू, पिसू, मनुका.

**वरील शब्दांतील शेवटच्या दोन अक्षरांचे निरीक्षण करा. काय जाणवते ?**

या शब्दांतील शेवटच्या अक्षराला काना, मात्रा, वेलांटी, उकार असे कोणते ना कोणते तरी एक चिन्ह आहे आणि शेवटून दुसऱ्या अक्षरांतील इकार किंवा उकार ऱ्हस्व आहेत.

**लक्षात ठेवा :** मराठी शब्दातील शेवटचे अक्षर दीर्घ स्वरान्त असेल, तर त्या आधीच्या अक्षरातील (उपान्त्य अक्षरातील) इकार व उकार ऱ्हस्व लिहितात.

तत्सम शब्दांतील उपान्त्य अक्षरे दीर्घ असतील, तर ती संस्कृतमधील मूळ शब्दांप्रमाणेच दीर्घ लिहावी.

उदा., क्रीडा, परीक्षा, लीला, संगीता, पूर्व, भीती.

**शिक्षकांसाठी :** विद्यार्थ्यांना विविध प्रसारमाध्यमांद्वारे प्रसारित होणाऱ्या विविध जाहिरातींचे श्रवण/वाचन करण्यास प्रवृत्त करावे.

# ११. ई–मेल

DI61V4


- **ऐका. वाचा. म्हणा.**

एक दोन तीन चार
जाते ई–मेल समुद्रापार
नवीन पद्धतीचा हा चमत्कार
आता कशाला होता बेजार ?

नको पेन, नको पाकीट
नको कागद, नको तिकीट
नको आता पोस्टात जायला
नको पोस्टमनची वाट बघायला.

हवा असतो घरी संगणक एक
टेलिफोन आणि मोडेम एक
किंवा मग इंटरनेट कॅफेत चला
झटपट ई–मेल करता येईल तुम्हांला.

मिनिटाच्या आत पत्र पोचते
वाचलंय की नाही तेही कळते
तिकडूनही उत्तर चटकन येते
डोक्याला अजिबात कटकट नसते.




**निर्मला सारडा** (जन्म–१९५२) : 'बाहुलीच्या लग्नाची तयारी', 'चांदोबाच्या कविता', 'गंमतगाणी', 'कविता कॉम्प्युटरच्या', 'कॅडबरीचा बाजार' हे बालकवितासंग्रह प्रसिद्ध.

प्रस्तुत कवितेतून ई–मेल या नवीन तंत्रज्ञानाची ओळख व उपयोग यांचे अतिशय रंजकपणे व सोप्या भाषेत वर्णन केले आहे.

**शब्दार्थ : समुद्रापार** – समुद्राच्या पलीकडे. **बेजार** – हैराण.

## स्वाध्याय



**प्र. १. खालील प्रश्नांची एक–दोन वाक्यांत उत्तरे लिहा.**

(अ) पोस्टमनची वाट बघायला नको, असे कवयित्री का म्हणतात?

(आ) ई–मेल करण्यासाठी कशाकशाची आवश्यकता असते?

(इ) ई–मेलमुळे अजिबात त्रास होत नाही, यामागची कवितेत आलेली कारणे लिहा.

**प्र. २. ई–मेलमुळे पोस्टमनचे काम खूप सोपे झाले आहे, असे तुम्हांला वाटते का? असे कशावरून वाटते?**

**प्र. ३. खालील शब्दजाल पूर्ण करा.**

ई–मेल संदर्भातील शब्द → ☐ → ☐ → ☐

**प्र. ४. संगणकाशी संबंधित असणारे तुम्हांला माहीत असलेले शब्द लिहा.**

## खेळूया शब्दांशी.

**(अ) खालील शब्दांसाठी मराठीतील शब्द लिहा.**

(१) कॉम्प्युटर– (२) इंटरनेट– (३) टेलिफोन–



## लिहिते होऊया.

- **ई–मेल आय डी सुरू करताना तुम्ही कोणकोणत्या कृती केल्या त्याचा क्रमवार ओघतक्ता तयार करा.**
- **मित्र/मैत्रिणींना ई–मेल पाठवण्याचा तुमचा अनुभव सात–आठ ओळींत लिहा.**

## नेहमी लक्षात ठेवा.

(१) संगणकाच्या स्क्रीनसमोर दीर्घकाळ बसू नये, त्यामुळे डोळ्यांवर ताण येतो.

(२) प्रत्येक वीस मिनिटानंतर जागेवरून उठून दहा–बारा पावले फिरून यावे, त्यामुळे आपले स्नायू सुस्थितीत राहतात.

(३) संगणकावर काम करणारी व्यक्ती व संगणकाची स्क्रीन यांमध्ये योग्य अंतर असावे.

(४) स्वत:चा पासवर्ड नेहमी गोपनीय ठेवावा.

(५) सर्व इलेक्ट्रिक वायर सुस्थितीत असल्याची खात्री करावी, तसेच संगणक चालू असताना आतील भागास हात लाऊ नये.



## सारे हसूया.

**काका** : अरे रवी, मोटारीनं तुला धडक दिली म्हणे.
**रवी** : त्या वेळी रस्त्यावरचा फलक वाचत होतो.
**काका** : काय लिहिलं होतं त्या फलकावर?
**रवी** : रस्त्यावरचे अपघात टाळण्याचे उपाय लिहिले होते.

**काकी** : मधू, तू तुझ्या आईचं सगळं ऐकतोस का ?
**सागर** : मी तर आई सांगते त्याच्या दुप्पट ऐकतो.
**काकी** : ते कसं काय ?
**सागर** : आई जेव्हा मला डब्यातून एक लाडू घ्यायला सांगते, तेव्हा मी चक्क दोन लाडू घेतो.

# १२. संतवाणी

- ऐका. वाचा. म्हणा.

**कांदा मुळा भाजी । अवघी विठाबाई माझी ॥१॥**
**लसूण मिरची कोथिंबीरी । अवघा झाला माझा हरी ॥२॥**
**मोट नाडा विहीर दोरी । अवघी व्यापिली पंढरी ॥३॥**
**सावता म्हणे केला मळा । विठ्ठल पायीं गोंविला गळा ॥४॥**

**–संत सावता.**

**संत सावता** – मराठी संत कवी. त्यांचे अभंग आशयाने समृद्ध आहेत. आपल्या प्रपंचातील नित्य कामांना त्यांनी परमार्थाचे साधन बनवले. आपल्या शेतात–मळ्यात राबताना ते विठ्ठलाचे भजन, नामस्मरण करत.

कांदा, मुळा, भाजी, लसूण, मिरची, कोथिंबिरी यांतच माझे दैवत आहे. माझ्या शेतातले मोट, नाडा, विहीर, दोरी यांमध्येच माझे पंढरपूर व्यापले आहे, असे प्रस्तुत अभंगातून संत सावता सांगतात.

**केळी आणि तया नारेळी पोफळी । कोण घाली मुळी दुध तया ॥१॥**
**बीज तैसे फळ येत असे गोड । जाणती निवाड संत याचा ॥२॥**
**फणस आणि आंबा सिंताफळे नाना । मुळीचिया चिन्हा गोड होती ॥३॥**
**बहेणि म्हणे बीज गोड त्याचे फळ । उत्तम केवळ सेव्य सर्वा ॥४॥**

**–संत बहिणाबाई.**

**संत बहिणाबाई** – मराठी संत कवयित्री. संत बहिणाबाई या संत तुकाराममहाराज यांच्या शिष्या होत.

केळी, नारळ, पोफळी यांच्या मुळाशी कोणीही दूध घालत नाही. फणस, आंबा, सिताफळे ही फळे मुळातच गोड असतात, कारण त्यांचे बीज गोड असते. चांगले कार्य केले, तर फळही चांगलेच मिळते, हे विविध दाखले देऊन प्रस्तुत अभंगाद्‌वारे संत बहिणाबाई सांगतात.

DIEHHR

## सुविचार

- **प्रगती हे जीवनाचे ध्येय असले तरी गती हा त्याचा आत्मा आहे.**
- **सत्य, सदाचार, अहिंसा, शांती, भूतदया ही जीवनाची मूल्ये आहेत.**
- **भविष्य पाहाणाऱ्यापेक्षा, जो भविष्य घडवतो त्याचं जीवन कृतार्थ होतं.**

- **पाठ्यपुस्तकातील पाठ क्र. २ व ३ मधील नवीन शब्द व त्यांचे अर्थ खालील चौकटींत दिले आहेत. ते वाचा. याचप्रमाणे इतर पाठांतील नव्याने परिचित झालेल्या शब्दांचा अर्थ समजून घेऊन तुमचा शब्दसंग्रह तयार करा.**

**पाठ क्र. २**

**कोडकौतुक करणे –** लाड पुरवणे.
**वैविध्यपूर्ण –** विविध प्रकारचे.
**नकार देणे –** नाही म्हणणे.
**विसंबून राहणे –** इतरांवर अवलंबून राहणे.
**पारितोषिक –** बक्षीस.
**निरंतर –** नियमित.
**सज्ज होणे –** तयार होणे.
**पारंपरिक –** जुन्या पद्धती, परंपरेप्रमाणे.
**कवेत घेणे –** मिठीत घेणे.

**पाठ क्र. ३**

**अगणित –** असंख्य.
**इवले –** लहान, छोटे.
**पागोळ्या –** छपरावरून खाली पडणाऱ्या पावसाच्या पाण्याच्या धारा.
**तृण –** गवत.
**पुष्प –** फूल.
**पखरण –** सडा.
**वर्षा –** पाऊस.
**सोहळा –** उत्सव, सण.
**धरणी –** जमीन.

- **वरीलप्रमाणे तुम्ही तुमचा शब्दसंग्रह तयार केला आहे. शब्दकोश कसा पाहावा, हे आपण खाली दिलेल्या उदाहरणांतून पाहूया.**

**'अ' गट**

पेढा, पौष, पतंग, पूर्ण, पैसा, पंकज, पुस्तक, पान, पोट, पीठ, पिचकारी


**'ब' गट**

पतंग, पान, पिचकारी, पीठ, पुस्तक, पूर्ण, पेढा, पैसा, पोट, पौष, पंकज

वर दिलेले 'अ' गटातील व 'ब' गटातील शब्द वाचा. 'अ' गटातील शब्द बाराखडीतील स्वरचिन्हांनुसार दिलेले नाहीत. 'ब' गटातील शब्द हे बाराखडीतील स्वरचिन्हांनुसार दिलेले आहेत.


पाठ्यपुस्तकातील पाठ क्र. २ आणि ३ मधील शब्द वरील भागात दिलेले आहेत. ते खालील चौकटीत शब्दकोशाप्रमाणे दिले आहेत. ते अभ्यासा.


(१) **अगणित –** असंख्य.
(२) **इवले –** लहान, छोटे.
(३) **कवेत घेणे –** मिठीत घेणे.
(४) **कोडकौतुक करणे –** लाड पुरवणे.
(५) **तृण –** गवत.
(६) **धरणी –** जमीन.
(७) **नकार देणे –** नाही म्हणणे.
(८) **निरंतर –** नियमित.
(९) **पखरण –** सडा.
(१०) **पागोळ्या –** छपरावरून खाली पडणाऱ्या पावसाच्या पाण्याच्या धारा.
(११) **पारितोषिक –** बक्षीस.
(१२) **पारंपरिक –** जुन्या पद्धती, परंपरेप्रमाणे.
(१३) **पुष्प –** फूल.
(१४) **वर्षा –** पाऊस.
(१५) **विसंबून राहणे –** इतरांवर अवलंबून राहणे.
(१६) **वैविध्यपूर्ण –** विविध प्रकारचे.
(१७) **सज्ज होणे –** तयार होणे.
(१८) **सोहळा –** उत्सव, सण.


































- पाठ्यपुस्तक मंडळाची वैशिष्ट्यपूर्ण पाठ्येत्तर प्रकाशने.
- नामवंत लेखक, कवी, विचारवंत यांच्या साहित्याचा समावेश.
- शालेय स्तरावर पूरक वाचनासाठी उपयुक्त.

पुस्तक मागणीसाठी www.ebalbharati.in, www.balbharati.in संकेत स्थळावर भेट द्या.

**साहित्य पाठ्यपुस्तक मंडळाच्या विभागीय भांडारांमध्ये विक्रीसाठी उपलब्ध आहे.**

ebalbharati

विभागीय भांडारे संपर्क क्रमांक : पुणे - ☎ २५६५९४६५, कोल्हापूर- ☎ २४६८५७६, मुंबई (गोरेगाव) - ☎ २८७७१८४२, पनवेल - ☎ २७४६२६४६५, नाशिक - ☎ २३९१५११, औरंगाबाद - ☎ २३३२१७१, नागपूर - ☎ २५४७७१६/२५२३०७८, लातूर - ☎ २२०९३०, अमरावती - ☎ २५३०९६५

महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे.

मराठी सुगमभारती इयत्ता ७ वी

₹ २७.००